दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

## रविवार पुरवणी १८ ऑगस्ट २०२४

## बंगालमधील डॉक्टर्सच्या मागण्या आणि सरकार

संपादकीय

**कोलकात्याच्या आरजी कर मेडिकल कॉलेज रुग्णालयात एका तरुण डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या झाल्याने संपूर्ण देशभरात संतापाची लाट उसळली आहे.**

**या घटनेचा निषेध म्हणून देशभरात आंदोलनं उभी राहिली आहेत. आरजी कर मेडिकल कॉलेजमध्येही बुधवारी, 14 ऑगस्ट रोजी या घटनेचा निषेध म्हणून आंदोलनं करण्यात आली.**




या दरम्यान, आंदोलन अधिकच तीव्र झाले कारण एका घटनेमुळे प्रकरण चिघळले. महिला संघटना आणि नागरी संघटनांच्या सदस्यांनी 14 आणि 15 ऑगस्टच्या मध्यरात्री "रिक्लेम द नाईट" या घोषणांसह महिलांना रस्त्यावर उतरून आवाज उठवण्याचे आवाहन केले होते.

आणि अचानक गर्दी वाढत गेली. जमावामध्ये असलेली काही माणसे बॅरीकेडसला ढकलू लागली आणि त्यांनी बॅरिकेड्स बाहेरच्या बाजूने ओढण्यास सुरुवात केली.आतल्या बाजूला आणखी एक भिंत बॅरीकेडसची होती पान बाहेरची बाजू तुटल्यावर जमाव एकदम आत घुसला आणि त्यांनी दोन्ही बॅरिकेड्स मोडून रुग्णालयात दाखल होत तोडफोड केली.या आंदोलनाला राजकीय वळण देण्यात आले असे आता दिसत आहे. हे सर्व पाहताना २१साव्या शतकातला भारत आणि युवा पिढी कोणत्या दिशेला चालली आहे हे समजण्यापलीकडे होते .

डॉक्टरांचे आंदोलन मोडून टाकून समाजाचे लक्ष दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न होत आहे हे या घटनेतून स्पष्ट होते. हत्या झालेली डॉक्टर, आपल्या मुलीचा झालेला मृत्यू याने विषन्न झालेले तिचे आई वडील, त्यांचे दुःख जाणून घेऊन समाजातील प्रत्येक थराने संयमाने वागणे अपेक्षित होते. पण झालेली घटना बघता समाजाला कोणत्याही गोष्टीची चाड नाही असेच म्हणावे लागेल. आंदोलनाला बसलेल्या डॉक्टरांच्या साहित्याची या युवा गुंड प्रवृत्तीच्या जमावाने केलेली मोडतोड आणि त्यांनतर रुग्णालयात घुसून केलेली मोडतोड पाहता यातून त्यांनी काय साध्य केले असा प्रश्न उभा आहे?

ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांची भौतिक संरचना सुधारण्यासाठी अधिक निधी दिला जावा. आरोग्य केंद्रांचे बांधकाम, स्वच्छता व्यवस्था, वीज, पाणी, आणि इतर मूलभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.ग्रामीण जनतेला मध्येच उपचार घेण्याची सुविधा करावी असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. कारण हार्टअॅटॅक आलेल्या रुग्णाला वाचविण्यासाठी ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यात आपत्कालीन स्थितीत उपयोगी पडणाऱ्या साधनांचा समावेश असावा. उदाहरणार्थ, व्हेंटिलेटर, डिफिब्रिलेटर, ईसीजी मशीन, रक्त परीक्षण साधने, इत्यादी. अशी कोणतीही आवश्यक उपकरणे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध नसतात आणि त्यामुळे रुग्णाला मोठ्या रुग्णालयात पाठविण्याचा सल्ला दिला जातो.यामध्ये बऱ्याच अंशी रुग्ण दगावतो आणि लोकांचा रोष डॉक्टरवर ओढवला जातो.

ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक औषधांचा साठा कायमस्वरूपी असावा. जीवनावश्यक औषधे, जंतूविरोधक औषधे, आणि अन्य आपत्कालीन औषधांची उपलब्धता सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्यात यावी. प्रसूतिशास्त्र, शल्यक्रिया, बालरोग, आणि इतर तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती केल्यास, स्थानिक आरोग्य केंद्रांची कार्यक्षमता वाढेल आणि जास्तीत जास्त रुग्णांची काळजी घेता येईल. रुग्णांचाही वेळ,शारीरिक कष्ट आणि धावपळ वाचेल.

ग्रामीण भागात आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तात्काळ दवाखान्यात पोहोचवण्यासाठी रुग्णवाहिकांची उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. रुग्णवाहिका सेवा अधिक प्रभावी बनवण्यासाठी GPS प्रणाली, रेडिओ संपर्क, आणि अन्य आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जावा. ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये तांत्रिक सुधारणा करण्यात याव्यात. तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांच्या आरोग्य स्थितीचा मागोवा ठेवणे, ऑनलाइन सल्लामसलत, आणि औषधांची ऑनलाईन ऑर्डर इत्यादी सुविधा विकसित केल्या जाव्यात.

ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये कार्यरत असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर, औषधांची शास्त्रीय माहिती, आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपाययोजना याबाबत त्यांना नियमितपणे प्रशिक्षित केले जावे. ग्रामीण भागात आरोग्य सेवांच्या महत्त्वाबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. यासाठी समाज जागरूकता कार्यक्रम, शिबिरे, आणि कार्यशाळा आयोजित केल्या जाव्यात, ज्यामुळे स्थानिक नागरिकांना आरोग्य सेवांच्या महत्वाबद्दल माहिती मिळेल.

सरकारने ग्रामीण आरोग्य केंद्रांच्या अपग्रेडेशनसाठी विशेष निधी राखून ठेवावा. आरोग्य केंद्रांमध्ये आधुनिक सुविधांचा समावेश करणे, नव्या इमारती बांधणे, आणि आवश्यक त्या साधनसामग्रीची उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात स्थानिक आरोग्य समित्या स्थापन करणे गरजेचे आहे. या समित्या आरोग्य केंद्रांच्या कार्यप्रणालीवर लक्ष ठेवतील आणि गरजांनुसार सुधारणा सुचवतील. या समित्यांमध्ये स्थानिक नागरिक, तज्ञ, आणि सरकारी अधिकारी यांचा समावेश असावा.

डॉक्टरवरील घटनेने ग्रामीण आरोग्य सेवांतील अनेक गंभीर समस्या समोर आणल्या आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सरकारने त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी विशेष व्यवस्था करणे, आरोग्य केंद्रांची सुधारणा करणे, आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सेवांबद्दल जागरूकता वाढवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासोबतच, डॉक्टरांच्या मागण्यांचे पालन करून त्यांचे काम अधिक सुरक्षित आणि सन्मानजनक बनवणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात आरोग्य सेवा अधिक प्रभावी बनवण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे, ज्यामुळे देशाच्या प्रत्येक नागरिकाला चांगल्या आरोग्य सेवांचा लाभ मिळू शकेल.

समाजाला आवश्यक असलेल्या सुविधा देण्यावर सरकारने लक्ष देऊन या मागण्या जेवढ्या वेगाने मंदिरे बांधून पूर्ण करतात त्याच वेगाने पूर्ण कराव्यात अशी समाजाची अपेक्षा आहे .

**'कायद्याचे बोलूया!'**

समाजात वावरताना आवश्यक कायदे व त्यासंबंधीची प्राथमिक माहिती प्रत्येक सर्वसामान्य नागरिकास असायला हवी या उद्देशाने **ठाणे, मुंबई येथील विख्यात विधितज्ज्ञ, प्रथितयश लेखक, वकील व नोटरी असलेले श्रीनिवास भार्गवराम घैसास** हे दै. सिंधुदुर्ग समाचारच्या वाचकांसाठी 'कायद्याचे बोलूया!' ही साप्ताहिक लेखमाला घेऊन येत आहेत. सिंधुदुर्ग समाचारचे सर्व वाचक व संपूर्ण समाजालाच या सदराचा फार मोठा उपयोग होईल अशी खात्री आहे.

# नारळी पौर्णिमा





## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

हर्णे पाजपंढरी हे कोकणातील सर्वात मोठे बंदर आहे. याशिवाय कोकणात सर्वात जास्त व मोठा मासळीबाजार येथेच भरतो. येथील मासळी केवळ महाराष्ट्र, गोव्यातच नाही, तर अगदी परदेशातही निर्यात होते. साहजिकच कोकणातील सर्वात मोठी मच्छिमार वस्ती पाजपंढरी येथे आहे. पाजपंढरीतील हजारो मच्छिमार कुटुंबांचा उदरनिर्वाह अशाच मासेमारीतून किंवा मासळीविक्रीतून होतो. येथील लोकांना कोळी किंवा नाखवा असेही म्हणतात. पावसाळ्याचे दोन अडीच महिने सोडले तर येथे मासेमारी हाच मुख्य व्यवसाय आहे. येथील कोळी लोक स्वतःला दर्यादेवाची लेकरे किंवा 'सागरपुत्र' मानतात. एक श्री राम आणि दुसऱ्या दर्यादेवावर येथील लोकांची अपार श्रद्धा आहे.

पाजपंढरी येथील कला व संस्कृतीचे अभ्यासक असलेले दिगंबर पावसे सांगतात, एक श्री रामनवमी आणि दुसरा, नारळीपौर्णिमा हे येथील दोन मोठे सण. त्यांपैकी येथील  नारळी पौर्णिमेचा सण तर विशेष प्रसिद्ध आहे. दिगंबर पावसे यांच्या म्हणण्यानुसार येथे फार पुर्वीपासून कोळी किंवा नाखवा लोकांची दाट वस्ती आहे. मात्र पुर्वीच्या काळात आजच्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक मासळी येथील मच्छिमारांना मिळायची. त्या काळात खोल दर्यात मासळीची सुबत्ता होती. अशी भरपूर मासळी विकून पैसेही भरपूर मिळायचे. याशिवाय पुर्वी सोन्यासारख्या मौल्यवान धातुचे दर आवाक्यात होते. आजच्यासारखे गगनास भिडलेले नव्हते. त्यामुळे त्या काळात पाजपंढरी येथील कोळी लोक नारळीपौर्णिमेच्या सणाला दर्यादेवाला खरोखरच्या सोन्याचा नारळ अर्पण करीत असत. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच दर्या बेफाम खवळतो. लाटांचे तडाखे, लाटांचे आकार अक्राळविक्राळ दिसतात. अशा काळात मच्छिमार लोक समुद्रात होड्या लोटत नाहीत. मात्र श्रावण पौर्णिमेदिवशी दर्यादेवाची पूजा करून हे मच्छिमार लोक त्याला शांत होण्याची विनवणी करतात. त्याच्यावरच्या अपार श्रद्धेचे प्रतिक म्हणून दर्यादेवास सोन्याचा नारळ अर्पण करतात. या दिवशी दर्यादेवाची पूजा केल्यावर दुसऱ्या दिवसापासून दर्या शांत होतो. पुढे पावसाळा सुरु होईपर्यंत तो मच्छिमार लेकरांचे रक्षण करतो, त्यांना भरपूर मासळीचे दान देतो अशी श्रद्धा या कोळी लोकांची आहे. मात्र सध्याच्या महागाईच्या दिवसांत सोन्याचा नारळ समुद्रास अर्पण करणे अशक्य असल्याने सोनेरी बेगड लावलेला नारळ या दिवशी दर्यास अर्पण केला जातो.

पाजपंढरी गावात एकूण दहा वाड्यावस्त्या आहेत. दरवर्षी एकेका वाडीकडे पाजपंढरी येथील श्री राम मंदिराच्या उत्सवाचे, व्यवस्थेचे व दैनंदिन कारभाराचे यजमानपद असते. ज्या वाडीकडे असे यजमानपद असते, त्याच वाडीकडे पुढे श्रावण महिन्यातील नारळी पौर्णिमेच्या सणाचेही यजमानपद असते. यजमानपद लाभलेली वाडी या नारळी पौर्णिमेच्या सणाचे, समारंभाचे नियोजन करते. यादिवशी यजमान वाडीतील सर्व स्त्री पुरुष श्री रामाच्या मंदिरात जमून नारळी पौर्णिमा सणाचे नियोजन करतात. एक प्रचंड मोठ्या आकाराचा नारळ बनवितात. या नारळाला सोनेरी बेगडीने मढवतात. श्री राम मंदिरात या नारळाची विधिवत पूजा करतात. या पुजेसाठी व पुढे तो नारळ दर्यादेवास अर्पण करण्यासाठी गावातील एका भाग्यवान जोडप्याची निवड करतात. नारळी पौर्णिमेच्या सणासाठी संपूर्ण गावातील सर्व आबालवृद्ध मंदिरात जमतात. मंदिरातली पूजा झाल्यावर या दर्यादेवाच्या नारळाची भव्य मिरवणूक व शोभायात्रा काढतात. या मिरवणुकीत पाजपंढरी गावातील सर्व जाती धर्माचे लोक सामील होतात हे येथील नारळी पौर्णिमेच्या सणाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणावे लागेल. हातगाडीवर हा भला मोठा नारळ विराजमान करून त्यांची संपूर्ण पाजपंढरी गावातून मिरवणूक काढतात. पुर्वी या मिरवणुकीत केवळ पारंपारिक वाद्यांचा वापर होत असे. मात्र आता या मिरवणुकीत खालुबाजा, बेंजो यांसारख्या वाद्यवृंदांचा वापर होतो. गावातील दहाही वाड्यांमधून, बाजारपेठेतून ही मिरवणुक शेवटी समुद्रावर पोहोचते. यादिवशी पाजपंढरीतील कोळी समाजाचे लोक पारंपारिक वेशभूषा करतात. पारंपारिक दागिने, अलंकार आदींनी नटून थटून सारे स्त्री पुरुष या मिरवणुकीत सामील होतात. समुद्रावर पोहोचल्यावर पारंपारिक नृत्याविष्कार करीत आधी ठरलेल्या भाग्यवान जोडप्याच्या हस्ते या दर्याच्या नारळाची विधिवत पूजाअर्चा, सामुहिक आरती होते. त्यानंतर छोट्या होडीतून हा नारळ खोल समुद्रात नेऊन तो दर्यादेवाला अर्पण केला जातो. अशाच प्रकारचा नारळ, मिरवणूक, नारळी पौर्णिमेचा सण जवळच्या हर्णे गावातही साजरा होतो.

पाजपंढरी येथे दरवर्षी फार मोठ्या उत्साहात साजरा होणारा हा नारळी पौर्णिमेचा सण फार प्रसिद्ध आहे. जवळपासच्या गावांतून, अगदी शहरांतूनही शेकडो लोक या सणासाठी पाजपंढरीत दाखल होतात. समुद्रालाच काय पण अवघ्या निसर्गालाच दैवत मानून त्याचे पूजन करण्याची परंपरा

# वाचन मेवा सेवा

## या लाडक्या मुलांनो



प्रवीण कुबल,
शिडवणे, ता. कणकवली.

मुलांनो , वाचन ही सर्वात चांगली सवय आहे. ती स्वतःला लावलात की दुसरे काही नको. मग हिच वाचनाची सवय तुमची आवड व्हायला वेळ लागणार नाही. ही तुमची  आवड काही दिवसांतच छंद बनून जाईल ते तुमचं तुम्हालाही कळणार नाही.

केवळ साक्षर होणे हे तुमचे उद्दिष्ट नाही. तुम्हाला खूप खूप वाचता येण्यासाठी सतत वाचत राहण्याची गरज आहे. तुम्ही त्यासाठी काय करता ? दररोज दहा पेक्षा जास्त पानांचं वाचन झालंच पाहिजे. मराठी वाचा , हिंदी वाचा. झालंच तर इंग्रजीही वाचा. पाठ्यपुस्तके वाचा. गोष्टींची पुस्तके वाचा. शालेय ग्रंथालयातील पुस्तके तर तुमची वाटच पाहत असतात. तुमच्या हातात पडली की त्यांच्या असण्याचं सोनं होऊन जातं.

मुलांनो , " वाचाल तर वाचाल " हा सुविचार तुम्ही ऐकला किंवा वाचला असेल. त्यात सारं काही आहे. तुम्हाला एकदा वाचनाचा छंद जडला की तुम्ही मिळतील ती पुस्तकं वाचून फडशा पाडत राहाल. बघा तरी तसे करुन. तुम्हाला नक्कीच जमेल ते. तुम्ही एवढं सगळं करता , मग हे जमायला काय !!! ही तर अगदी सोप्पी गोष्ट आहे , नाही का ?

पुस्तकांचा संग्रह असणं ही सुद्धा तुमची आवडती सवय बनू शकते. तुमचं स्वतःचं मिनी वाचनालय असलं की तुमची मज्जाच मज्जा. कधी वाटेल तेव्हा तुम्हाला त्यातले एखादे पुस्तक काढून वाचू शकता. तुम्हाला एखादा निबंध लिहायचा असला , तर त्यातला संदर्भ वापरु शकता.

मुलांनो , आणखी एक गोष्ट लक्षात असू द्या. रेडिमेड निबंध कधीच लिहू नका. निबंधाचे पुस्तक जवळ असावे , पण त्याची नक्कल करु नका. त्यातील निबंध वाचा आणि न बघता स्वतःच्या मनाने नवीन निबंधाची निर्मिती करा. आता लिहिलेला नवा निबंध म्हणजे तुमची स्वतःची निर्मिती असेल. आता बघा , तुम्हाला जो आनंद झालेला असेल , तो तुम्ही शब्दांत व्यक्त करणेही कठीण होऊन बसेल. अभ्यासात असा आनंद होणं म्हणजेच खरा अभ्यास.

मुलांनो , वाचन करताना ते समजपूर्वक वाचा. तुम्ही नुसती अक्षरे आणि कोरडे शब्द वाचू नका. त्यातला



अर्थ समजून घ्या. आता हा अर्थ समजणार कसा ? हा प्रश्न तुम्हां लहानांनाच काय मोठ्यांनाही पडतो बरं का ? मग आम्ही मोठी माणसे काय करतो , तीच ओळ , तोच परिच्छेद पुन्हा पुन्हा वाचतो. मला वाटतं , तुम्हीही तसंच करावं. पुन्हा , पुन्हा वाचावं. आणि एकदा समजलं की ते चांगलं लक्षात ठेवावं. या लक्षात ठेवलेल्या ज्ञानाचा वापर आपल्याला पुढे अनेक ठिकाणी करायचा आहे. बोलताना , भाषण करताना , निबंध लिहिताना , उत्तरे लिहिताना , कविता लिहिताना , पत्र लिहिताना आणि बरंच काही लिहिताना या शब्दांचा तुम्ही वापर कराल. तुम्ही एकदा छान वाचायला शिकलात की मग या साऱ्या गोष्टी तुम्हाला पटापट येत जातील.

मुलांनो , तुम्ही दोन प्रकारचं वाचन करता. एक म्हणजे प्रकटवाचन. हे वाचन मोठ्याने करायचे असते. तुमचं हे वाचन दुसऱ्यांनाही ऐकू येतं. शाळेत तुम्हाला सर्वांसमोर जे वाचन करायला लावतात ना , ते तुमचं प्रकटवाचनच असतं. यालाच ' लावडेड रिडींग ' असं म्हणतात. दुसरं वाचन म्हणजे मूकवाचन. हे वाचन फक्त डोळ्यांनी करायचं असतं. त्यावेळी आपल्या ओठांची हालचाल मुळीच करायची नसते. तुमच्या डोळ्यांच्या कक्षेत जेवढे शब्द , वाक्ये येतील ती आवाज न करता मनात वाचायची असतात. याला ' सायलेंट रिडींग ' असंही म्हणतात. तुम्ही ही दोन्ही प्रकारची वाचने करत असणार याची खात्री आहे. जर करत नसाल तर आजपासून सुरु करा. तुम्हाला हे नक्की जमेल. मग तुम्ही आपल्या वाचनाचा वेग वाढवत चला. एका मिनिटांत कालपेक्षा आज जास्त शब्द वाचले याचे स्वतःचे मूल्यमापन करा. जलदगतीने वाचन करण्याला ' गतीवाचन ' म्हणतात. अर्थात ' स्पीड रिडींग ' तुम्हाला सगळ्यात स्पीड वाढवणं आवडतं ना ? मग वाचनाच्या स्पीडमध्ये अजिबात मागे राहू नका.

ज्याचे वाचन चांगले असते , तो चारचौघात उठून दिसतो. तुम्ही तुमचे वाचन नक्कीच समृद्ध कराल आणि चारचौघातच नाही तर सर्वोत्तम ठराल. चला तर मग , वाचनाचा मेवा सेवन करताय ना !!!

## कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.

टायटल सर्टिफिकेटबद्दल माहिती घेताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे टायटल सर्टिफिकेटचा अर्थ सर्वसाधारणत्वात 'मालकी हक्कांचा दाखला' असा घेता येईल. या दाखल्यासंबंधीची कागदपत्रे कशी पहावीत याची माहिती आपण सविस्तरपणे घेतलेली आहे. तरीसुद्धा सर्व गोष्टींची माहिती या पुस्तकात देणे कठीण आहे. एवढेच नव्हे तर टायटन रिपोर्ट बनवताना किती कायद्यांचा आधार घ्यावा लागेल हे एखादी केस बघितल्यावरच आपणास ज्ञात होईल. थोडक्यात प्रत्येक केसप्रमाणे टायटल रिपोर्ट पाहताना कोणत्या गोष्टी पाहव्यात हे बदलत जाते. कायद्यांचा संदर्भ बदलतो. म्हणजेच एखाद्या सूत्रामध्ये ही गोष्ट बांधता येत नाही. अमुक एक गोष्ट पहा आणि टायटल रिपोर्ट मिळवा असे होत नाही. तरीसुद्धा दैनंदिन व्यवहारात शेतजमीन, विनशेत जमीन, सदनिका, गाळे, औद्योगिक गाळे अशी वर्गवारी आपण केली. त्याची माहिती घेतली तरी अशा कितीतरी वर्गवाऱ्या करता येतील. तरीसुद्धा सद्यपरिस्थितीत वारंवार काही मिळकती टायटलसाठी आल्या तर ढोबळमानाने कोणत्या गोष्टींकडे **आपणाला लक्ष द्यावे लागेल याची माहिती आपण घेऊया.**

१) एखादा मालमत्ता सिडकोली असेल तर म्हणजेच सिडकोने विकसित केली असेल तर पुढील गोष्टींकडे जरूर लक्ष द्यावे.

१) सिडकोकडून मिळालेले अलॉटमेंट लेटर व ताबा पत्र.
२) सिडको बरोबर झालेले लिज डीड.
३) सिडकोला सदर जमीन कशी प्राप्त झाली त्यासंबंधीचे नोटीफिकेशन वा अन्य तत्सम कागदपत्र.
४) सिडकोकडून मिळालेली एन. ओ. सी. सिडकोची बांधकाम परवानगी व बांधकाम झाल्यावर दिलेले भोगवटा प्रमाणपत्र व सिडकोचा नकाशा.
५) म्हाडामधील मालमत्तेविषयीची महत्त्वाची कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत.
अ) म्हाडाचा लेआऊट
ब) नोंदणीकृत लिज डीड
क) म्हाडाचे अलॉटमेंट लेटर
ड) म्हाडाची एन. ओ. सी. आणि ताबा पत्र व नकाशा

यानंतर पुष्कळवेळा मालमत्तेचा शोध घेताना असे लक्षात येते की सदर मालमत्ता एम. आय. डी. सी. ची आहे, अशा बाबतीत पुढील कागदपत्रे पहावीत.

वरील म्हाडा व सिडकोमधील कागदपत्रांप्रमाणेच सर्व कागदपत्रे एम. आय. डी. सी. कडून घ्यावीत. त्या व्यतिरिक्त एम. आय. डी. सी. ची मिळकत गहाण ठेवण्यासाठी करावा लागणारा त्रिपक्षीय करारनामा.

यानंतर आणखी एक महत्त्वाची गोष्ट टायटल सर्टिफिकेटच्या अनुशंगाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कित्येक बांधकाम प्रोजेक्टमध्ये यु. एल. सी. सर्टिफिकेटचा देखील समावेश केलेला असतो. म्हणजेच सदर जमीन कमाल मर्यादेपर्यंत धारण करता येते याची माहिती आपणाला आवश्यक असते. ही गोष्ट विशेषकरून शेतजमिनीच्या बाबतीत लागू पडते. **आता शेतकरी कोणत्या प्रकारची जमीन किती मर्यादेपर्यंत आपल्या ताब्यात ठेवू शकतो ते आपण पाहूया.**

**१)** सर्वसाधारणपणे कोरडवाहू शेतजमीन ५४ एकर(२१.८५.२१ हेक्टर)
**२)** वर्षभर पाणी पुरवठा असणारी सुपीक जमीन१८ एकर (७.२८.४३ हेक्टर)
**३)** एक पिक घेऊ शकेल अशी जमीन व पाणी पुरवठ्याची खात्री नसणारी जमीन २७ एकर (१.१२.६५ हेक्टर)
**४)** पाणी पुरवठ्याची शाश्वती नसणारी जमीन ३६ एकर (१४.५६.८८ हेक्टर)

त्याचप्रमाणे मुंबई उपनगरे, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील सिरोळा तालुक्यातील सलग ३ वर्षे भातशेतीसाठी असणाऱ्या जमिनीबाबत ही मर्यादा ३६ एकर इतकी निश्चित केली गेली आहे. अर्थात या मर्यादा बदलू शकतात म्हणूनच ज्यावेळी असा टायटल रिपोर्ट घ्यायचा असेल त्यावेळी किती मर्यादा आहे याची खात्री करून घ्यावी.

## १. टायटल सर्टिफिकेट संबंधीची माहिती




टायटल रिपोर्टच्यावेळी उपनिबंधक कार्यालयातून प्रत्यक्ष सर्च घेणे एक मोठे काम आहे. ग्रामीण भाग सोडला तर शहरी भागात एका एका शहरामध्येसुद्धा ७ ते ८ इतकी निबंधक कार्यालये असतात. प्रत्येक कार्यालयाच्या वेळा या वेगवेगळ्या असतात. कित्येक ठिकाणी रेकॉर्ड नीट लावलेले देखील नसते. कित्येकवेळा काही कागदपत्रे बायडींग करायला देखील गेलेली असतात. कित्येकवेळा रजिस्टरमधील पाने देखील फाटलेली असतात. अशा या परिस्थितीत अगदी अचूक अहवाल / रिपोर्ट देणे खूपच कटकटीचे होते. आणि चुकीचा रिपोर्ट गेला तर बदनामी सहन करण्याची पाळी संबंधित रिपोर्ट देणाऱ्यावर येते. या अडचणी प्रत्यक्ष कार्यालयातून शोध केल्याचेवेळी येतात. आता तर ऑनलाईन शोध घेता येतो. या ठिकाणीसुद्धा अनेक घोटाळे होतात. कित्येकवेळा शासकीय साईटच उघडत नाही. उघडल्यास ती अत्यंत हळू (स्लो) चालते. कित्येकवेळा त्यात एखादे गाव दिसतच नाही. कित्येकवेळा गावाचे नाव अशिलाने चुकीचे घातले व ही चूक लक्षात न आल्यास त्याची नोंद दिसतच नाही. अशा अनेक अडचणी देखील संगणकीय शोध घेताना येतात. **म्हणूनच संबंधितानी ज्या गोष्टी आढळल्या त्याचा उल्लेख रिपोर्टमध्ये, टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेटमध्ये करणे आवश्यक आहेत त्या पुढीलप्रमाणे-**

१) संबंधित रजिस्टरची पाने फाटलेली आहेत.
२) संबंधित रजिस्टर कार्यालयात दप्तर उपलब्ध नाही.
३) संबंधित रजिस्टर कार्यालयातील दप्तर बायडींगसाठी दिलेले आहे.
४) संबंधित पानांची संख्या जुळत नाही. (काही पानेच गायब आहेत इ.) या व्यतिरिक्त एखादी त्रुटी आढळल्यास असा रिपोर्ट अथवा अहवाल देताना संबंधितानी आपल्या रिपोर्टमध्ये दोन मुद्दे मुद्दामहून घालावेत ते असे-
**१) ऑब्झर्व्हेंशन क्लॉज (कलम) २) सजेशन क्लॉज (कलम) आता या कलमांचा काय फायदा होतो तो आपण पाहूया.**

एखादी गोष्ट आपण का मान्य केली किंवा एखाद्या त्रुटीकडे का दुर्लक्ष करू शकतो याचे स्पष्टीकरण देणारे कलम पुष्कळवेळा बँकांच्या स्टैंडर्ड फॉर्ममध्ये नसते मग अशावेळी रिपोर्टच्या संबंधात असणारी त्रुटी जर आपल्याला रेकॉर्डवर आणायची आहे. परंतु त्या त्रुटीपासून मालमत्तेच्या मालकी हक्कावर काही परिणाम होणार नसेल तर या सर्व गोष्टी आपण निरीक्षण या कलमात (ऑब्झर्व्हेशन क्लॉज) मध्ये नमूद करू शकतो. म्हणजे आपण यातील त्रुटी आपल्या लक्षात आली होती याचा उल्लेख आपोआप त्या ठिकाणी होतो. याशिवाय एखादी त्रुटी आढळली व ती एखाद्या उपायाने दूर करणे शक्य असेल तर तसा सल्ला अथवा तसे मार्गदर्शन आपण सल्ला कलमामध्ये (सजेशन क्लॉज) मध्ये देऊ शकतो. तेवढी गोष्ट केली की त्या मालमत्तेच्या मालकी हक्कास बाधा पोचत नाही हे देखील या ठिकाणी स्पष्ट होते. म्हणून आवश्यक त्या ठिकाणी सर्च रिपोर्ट देणाऱ्या वकीलानी वरील दोन कलमे आपल्या रिपोर्टमध्ये आपणहून घालावीत जेणेकरून सर्च रिपोर्ट देणाऱ्या व्यक्तीची जबाबदारी आपोआपच कमी होते.

याशिवाय ज्या ठिकाणी मालकी हक्काबद्दल शंका असतील एखादा दस्ताऐवज उपलब्ध नसेल एखाद्या व्यक्तीला किती वारस आहेत या गोष्टी स्पष्ट होत नसतील तर त्याला एक उपाय संबंधित मालमत्ता ज्या न्यायदान क्षेत्रात मोडते त्या न्यायदान क्षेत्रात प्रसिद्ध होणाऱ्या व ज्याला जिल्हा वर्तमानपत्राचा दर्जा असेल अशा वृत्तपत्रात जाहिरात देवून सदर मालमत्तेचा मालकी हक्कासंबंधी कुणाचा काही दावा असेल तर त्या सर्वांना आवाहन करून त्यांचे दावे /आक्षेप/त्यांचे म्हणणे मागवून घ्यावे. जेणेकरून या मालमत्तेवर कोण कोणत्या कागदपत्राच्या आधारे दावा सांगत आहे, हक्क सांगत आहे याची माहिती आपणाला होईल. आणि आक्षेप घेणाऱ्यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य असेल तर त्याचे निराकारण करता येईल अथवा त्याच्यामध्ये काही तथ्य नसेल तर त्याकडे दुर्लक्ष करता येईल.

अर्थात हे केले म्हणजे १००% मालमत्तेची मालकी निर्धोक झाली असे मानण्याचे कारण नाही. कारण सदर पेपर (वृत्तपत्र) मी वाचलाच नव्हता, मी बाहेरगावी होतो. त्यामुळे मला सदर जाहिरात/नोटीस वाचता आली नाही म्हणून मागाहून देखील मालकी हक्कासंबंधी वाद उत्पन्न होऊ शकतात. परंतु त्यावेळी जाहिरात देणाऱ्याचा हेतू तरी स्पष्ट होतो. त्याचा हेतू कुणाला फसवण्याचा नव्हता हे तरी त्यातून सिद्ध होते. अर्थात जाहिरात देताना ती सविस्तर द्यावी. हरकती मागवण्यासाठी आवश्यक तेवढी मुदत त्यात देण्यात यावी. त्यानंतर कोणत्या हरकती आल्या वा कोणतीही हरकत आली नाही या बाबतीतील वकिलाचे सर्टिफिकेट घ्यावे व ते जपून ठेवावे. कारण ते महत्त्वाचे असते. टायटल रिपोर्टमध्ये काही गोष्टींचा स्पष्ट खुलासा होणे आवश्यक असते. त्यामध्ये एखाद्या मिळकतीचे मालकी हक्क निर्धोक आहेत किंवा कसे याबद्दलचे स्पष्ट मत टायटल रिपोर्टमध्ये असावे. त्याचप्रमाणे सदर मिळकत ही बाजारात विकली जाईल की नाही, सदर मिळकतीवर कोणताही बोजा मग तो शासकीय, वित्तीय संस्था आदीपैकी कुणाचाही असो, अथवा एखाद्या न्यायालयीन आदेशाने एखाद्या मालमत्तेवर बोजा दाखल केलेला असतो तसा बोजा सदर मिळकतीवर आहे काय ? याचा खुलासा देखील आपल्या रिपोर्टमध्ये होणे आवश्यक आहे. आता काही बोजे हे ७/१२ वरती नोंदलेले असतात. परंतु कित्येकवेळा गहाणखत, लिज पेंडसीसारखे उपनिबंधक कार्यालयात नोंद केलेले बोजे ७/१२ वर जमिनीच्या तत्सम दप्तरी दाखल झालेले असतीलच याची खात्री देता येत नाही. म्हणूनच जेव्हा आपण संबंधित उपनिबंधक कार्यालयात मालकी हक्कांचा शोध घेतो त्यावेळी जर दर्शवल्याप्रमाणे कोणतेही बोजे आढळल्यास त्याचा उल्लेख आपल्या सर्च टायटल रिपोर्टमध्ये करणे आवश्यक आहे.

(उर्वरित भाग पुढील रविवारी)

## 'निमित्त'



**डॉ. मधुरा मेहेंदळे, ठाणे**

# आदर्श व गुरुतुल्य घैसासगुरुजी



दापोली तालुक्यातील केळशी पंचक्रोशीतील सुप्रसिद्ध शिक्षक, प्रवचनकार, पुरोहित तसेच कीर्तनकार श्री भार्गवराम अनंत घैसास उर्फ घैसास गुरुजी यांचे एक वर्षापूर्वी निधन झाले. ते माझे आजोबा होत. आम्ही त्यांना अण्णा म्हणत असू. त्यांच्याबरोबर मला लहानपणी राहण्याचे भाग्य मिळाले. त्यांनी केलेले संस्कार आजही मला उपयोगी पडत आहेत. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणारा व त्यांच्या कार्याची माहिती देणारा हा लेख.

अगदी अचानक ध्यानीमनी नसताना गेल्या वर्षी माझ्या बाबांचा फोन आला की, अण्णांना बरे नाही. मी हॉस्पिटलमध्ये आणत आहे. कालपर्यंत अण्णा चांगले हिंडत फिरत होते. मग आज काय झाले? माझ्या मनात शंकेची पाल चुकली. मी त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करून घेतले. वयोमनाप्रमाणे काही गोष्टी सोडल्या तर ते नॉर्मल होते. मात्र दुसऱ्या दिवशी अचानक आमच्या कोणाच्याही ध्यानीमनी नसताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यात त्यांचा अंत झाला. खरोखरच ते आम्हाला चूटपूट लावून गेले. त्यांचा स्वभाव बोलका, त्यांचे वाचन अफाट. त्यामुळे ते कोणत्याही प्रश्नाला समर्पक उत्तरे देत असत. आज ते आमच्यात नाहीत यावर विश्वासच बसत नाही.

अण्णा हे मराठी शाळेत शिक्षक म्हणून काम करायचे. ते सेवानिवृत्त झाले तेव्हा मुख्याध्यापक होते. माझ्या लहानपणी ते वेळास गावी नोकरीला होते. त्यावेळी माझ्या बालहट्टासाठी ते रोज वेळासहून केळशीला पायी यायचे. त्यासाठी त्यांनी कधीही कुरकुर केली नाही. आपल्या नाती संस्कारक्षम व्हाव्यात, व्यवहारिक जगात त्या कुठेही कमी पडू नयेत यासाठी त्यांनी आम्हाला अगदी रामरक्षा, अथर्वशीर्ष पासून पोहणे, सायकल शिकवण्यापर्यंत सर्व काही शिकवले. त्यावेळी त्यांनी केलेले संस्कार आजही मला आयुष्यामध्ये खूप उपयोगी पडत आहेत. कोणतीही गोष्ट करताना ती मनापासून करायची ही त्यांची शिकवण. कुठलेही काम करायला संकोच करू नका असे ते नेहमी सांगत असत. याही गोष्टी माझ्या आयुष्यामध्ये निश्चितपणे उपयोगाला येत आहेत आणि त्या किती महत्त्वाच्या होत्या हे आज मला जाणवत आहे. माझ्या लहानपणीचा काळ म्हणजे सुमारे सदतीस वर्षा पूर्वीचा काळ. त्यावेळी देखील मुलींना सायकल आली पाहिजे, मुलामुलींना पोहता आले पाहिजे हा त्यांचा कटाक्ष असे. कुठली गोष्ट कठोर परिश्रमाशिवाय प्राप्त होत नाही याचा जणू ते वास्तु पाठच होते.

अण्णांच्या लहानपणी घरी अठराविश्वे दारिद्र्य वसलेले होते. त्यांचे वडील माझे पणजोबा भ्रमिष्ट झालेले. त्यांची आई माझी पणजी ते दीड वर्षाचे असताना निवर्तली. त्यामुळे त्यांनी जवळपास आईविना आयुष्य काढले. सहाजिकच लहानपणापासून त्यांच्या खाण्या पिण्याची आबाळ झाली. आई नसलेले पोर म्हणजे कुणीही या आणि टपली मारून जा अशा प्रकारचा समाजाचा एक समज. याचा त्रास त्यांनादेखील झाला. तरी त्याचा बाऊ न करता त्यांनी आपले फायनल पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी शिक्षकाचा पेशा स्वीकारला आणि त्यानी तो चाळीस वर्षे एक व्रत म्हणून चालवला देखील. या चाळीस वर्षात त्यांच्या हाताखालून हजारो विद्यार्थी शिकून गेले. आज त्यांच्या हाताखाली शिकलेले काही विद्यार्थी वृद्धत्वाकडे झुकले आहेत.

शाळेमध्ये ज्या मुलांचा अभ्यास कमी आहे असे त्यांना वाटे, त्यांना ते घरी बोलून शिकवत असत. मात्र त्यांनी या शिकवणीचा कोणताही मोबदला घेतला नाही. विद्यार्थ्यांना पुरेपूर ज्ञान द्यायचे व त्यासाठी जे काही करावे लागेल ते ते करायचे हा त्यांचा खाक्या होता . आणि म्हणूनच अनेक विद्यार्थी सकाळ संध्याकाळ त्यांच्याकडे शिकवणीला येत असत यातून त्यांना कमालीचे समाधान लाभत असे. व्यवहारात अनेकांनी तुम्ही आमचे देणं आहात असे सांगून त्यांच्याकडे पैशांची मागणी केली त्याबद्दल खातरजमा न करता जर आपल्या वडिलांनी किंवा अन्य कोणी जवळच्या नातेवाईकांनी पैसे घेतले असतील तर ते परत करणे आपले कर्तव्य आहे असे समजून त्यांनी ते परत केले. त्यामुळे त्यांची परिस्थिती कायमच बेताची राहिली. अशावेळी संसाराला हातभार लावण्यासाठी त्यांनी कीर्तने करण्यास सुरुवात केली. ही कीर्तने करत असताना देखील त्यांना अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागला. अनेक हितशत्रूंनी सरकारी नोकरीत असताना कीर्तने कशी काय करतात अशाप्रकारच्या त्यांच्याविरुद्ध तक्रारी देखील केल्या परंतु ती कीर्तने करताना देखील त्यांनी सामाजिक भान ठेवले होते. त्या कीर्तनातून त्यानी कुटुंब नियोजन, वृक्षलागवड ,पर्यावरण आदी विषय त्याचबरोबर

**(पान ६ वर)**

---

# प्रेमाने जगून बघा!

## मनाचिये गुंति...



**सुभाष भाऊ चोपडे,**
**पाचल, ता. राजापूर.**



देव देवळात नाही तो माणसात आहे.तो आहे की नाही हेपण माहीत नाही मात्र माणसाचे कर्म जसे असते तसे त्याला फळ मिळते एवढे मात्र निश्चित. परमेश्वराने जन्माला घातले प्रत्येक जीवाला.त्याच्यामुळे आपण सृष्टी पाहू शकलो यावर प्रत्येकाचा जवळपास विश्वास असतोच अस दिसून येते.मरावे परि किर्तीरुपी उरावे अस म्हंटल्याप्रमाणे कित्येकजण आपल्या कर्माने अमरत्व प्राप्त करतात.काही जन्माला येतात,किड्यामुंगीसारखे जगतात आणि मरून जातात. काही असे असतात की स्वतःच्या जगण्याचा आनंद घ्यायचे सोडून इतरांचा द्वेष करत जगत असतात.एखाद्याची प्रगती पाहून,त्याला मिळणारा मान सन्मान पाहून,त्याची इतरत्र होणारी वाहवा पाहून काहीजणांना खूप वाईट वाटते आणि मग सुरू होते त्याच्या द्वेषापोटी त्याच्याविषयी कुभांड रचणे, त्याच्यासमोर गोड बोलून त्यालाच अडचणीत आणण्याचा प्रयत्न करणे, त्याला सदैव पाण्यात पाहणं आणि यावरही थांबलं नाही तर देवदेवस्की अथवा लाज सोडून कोणत्याही थराला जायची तयारी दाखवणं सुरू होत.एखाद्याविषयी एवढं जळण्यापेक्षा त्याच्या कर्माचा ,बौद्धिक क्षमतेचा, कष्टाच्या तयारीचा, समाजभान जोपासण्याचा जरा तरी विचार केला तर आपली चूक लक्षात येऊ शकते पण दुर्दैवाने तस घडत नाही.मलाच मोठे म्हणा,मलाच मानसन्मान हवा,जे कळत ते मलाच कळत अस जेंव्हा वाटत ना तेंव्हा खरतरं आपण आयुष्याच्या प्रत्येक कसोटीवर चुकत असतो याची जाणीव होत नाही.यातूनच क्षणभंगुर आनंद मिळतो पण पुढे पश्चातापाशिवाय काही पदरात पडत नाही हेही तितकेच खरे.कारण आपल्याबद्दल,आपल्या मुलाबाळविरुद्ध दुसऱ्याने वाईट मनात आले तर?

आपण आपले काम प्रामाणिक करत राहिलो यात आपला दोष काय हो ? पण आपल्या कर्मातून दुसऱ्याला का दुःख वाटावं?आपली प्रगती आणि सर्वकाही दुसऱ्याच्या नजरेत का खुपाव?त्यानं मग वाईट मार्गांचा अवलंब करून त्याला दुःख देण्याचा प्रयत्न करावा,त्याचे दुःख पाहून असुरी आनंद मिळवावा हे खूप वाईट. पण हेही तितकेच सुर्यप्रकाशाईतक सत्य आहे की,ज्या हातांनी काळ लावण्याचा प्रयत्न केला ते हात आधी काळे होतील.आपल्या कर्माची फळ आपल्याला इथंच भोगावी लागणार आहेत. तेंव्हा मोठमोठे विचार इतरांना ऐकवण्याऐवजी, मोठमोठ्या गप्पा मारण्याऐवजी आपला चांगला आचार आणि साधी विचारसरणी जी समाजाचं भान राखून आपण त्याचे देणं लागतो हे लक्षात ठेवून व्हायला हवी.अहो,येताना रिकाम्या हातांनी आलो आणि जाताना रिकाम्या हातांनीच जाणार आहोत तर मग का कुणाचा द्वेष करावा ? का एखाद्याच्या पोराबाळविषयी वाईट मनात आणून कृत्य करावं ? हे जग खूप सुंदर आहे आणि आपल्या आचरणाने ते अधिक सुंदर करता येऊ शकत पण तसं आपलं मनही शुद्ध आणि पवित्र हवे. आपल्याकडून नकळतपणे काही चुका झाल्या असतील तर त्या परमेश्वराजवळ पश्चात्ताप व्यक्त करा. ज्यांच्याबद्दल मनात आकस असेल त्या व्यक्तीशी बोला,एकदा त्याचा हात हातात घेऊन आपल्या चुकीची कबुली द्या मग बघा आयुष्यभर जे ओझं उरात सांभाळून आहात ते किती हलकं वाटेल.प्रेमाने सारं जग जिंकता येते म्हणतात मग कशाला कुणाचा द्वेष करायचा?नसेल कुणाशी चांगलं वागता येत तर निदान त्याच्याशी वाईट तरी वागू नका.प्रत्येकाने चांगले वागायचे ठरवले तर या जगातला एक वाईट माणूस कमी होईल.

जमलं तर बघा चांगले आचार विचार अंगी बाणवून!जगणं खूप आनंदी आणि उत्साही होईल.प्रेम देऊया आणि घेऊया आणि माणुसकीची बिजे रोवत आपल्या मुलांना,देशाच्या भावी नागरिकांना सक्षम करूया प्रेमाने भारतभूमीला घडविण्यासाठी!इथून पुढे तरी बेगडी वागायला नको,कुणाचा द्वेष नको,कुणाबद्दल वाईट विचार नको, मला सदैव चांगली बुद्धी दे,चांगले आचार विचार माझ्याकडून घडोत, माझ्याकडून,घरादाराकडून समाजासाठी चांगले कार्य करण्याचे बळ मिळो असे मागणे देवाकडे मागुया आणि माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करूया.

# सूर्य किरण चिकित्सा

## अध्यात्म



ज्योतिर्विंद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

भारतीय ज्योतिष शास्त्रात प्रारंभी सूर्य चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहू आणि केतू अशा नवग्रहांचा आणि त्यांच्या प्रभावांचा उल्लेख आहे. या नवग्रहांमध्ये राहू आणि केतू हे छायाग्रह मानले जातात. प्रत्यक्षात इतर ग्रहांप्रमाणे यांचे गोल किंवा गोळे नाहीत. चंद्राचा पृथ्वीभोवती फिरण्याचा भ्रमण मार्ग आणि पृथ्वीचा सूर्याभोवती फिरण्याचा भ्रमण मार्ग हे दोन मार्ग एकमेकांना दोन भिन्न बिंदूंत छेदतात. या दोन मार्गांच्या दोन छेदनबिंदूंना राहू आणि केतू अशी नावे दिली गेली आहेत. या दोन बिंदूंमधील अंशात्मक अंतर हे १८० अंश आहे. त्यामुळे हे दोन्ही बिंदू परस्परांच्या समोरासमोर असतात. हे दोन छेदनबिंदू प्रत्यक्षात ग्रह नसले तरी मानवाच्या ग्रहदशेमध्ये इतर ग्रहांपेक्षाही जोरदार प्रभाव पाडतात. म्हणून त्यांना ज्योतिषशास्त्रात ग्रहण प्रमाणे मानले जाते. असो. उर्वरित सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र आणि शनी या सात ग्रहांमध्ये सूर्यग्रहाला राजाप्रमाणे स्थान आहे. आध्यात्मात तसेच ज्योतिष शास्त्रात सूर्याला ' आत्माकारक ' मानले गेले आहे. पृथ्वी आणि स्वर्ग यांच्यामध्ये असणाऱ्या ब्रह्मांडाचे केंद्रस्थान हे सूर्य मानले गेले आहे. सूर्यामुळे दिशा, आकाश, अंतराळलोक किंवा अंतरिक्षलोक, भुलोक स्वर्गलोक, नरक, पाताळ आणि अन्य लोक यांचे विभाग पडतात. सूर्य हा विभाजक रूपात स्थानापन्न असल्यामुळे त्याला ' मार्तंड ' नावाने संबोधले जाते.

अलीकडे सूर्याबाबत अपार संशोधन झालेले आहे. सौर ऊर्जा शक्तीचा अनेक प्रकारे उपयोग केला जात आहे. सूर्यकिरणांच्या शक्तीत असाध्य रोग बरे करण्याची क्षमता आहे. सूर्यकिरणांच्या या औषधी क्षमतेचे महत्व आपल्या इथे सूर्यप्रकाश भरपूर मिळत असल्यामुळे आपल्याला फारसे वाटत नाही मात्र जेथे सूर्यप्रकाश फारच कमी प्रमाणात मिळतो अशा ठिकाणी त्याचे महत्त्व अधिक आहे. पश्चात्य देशांत ' क्रोमोपॅथी ' ही औषधोपचारी सूर्यकिरण चिकित्सा रूढ आहे. ' सूर्यकिरण चिकित्सा ' ही अल्पमोली परंतु बहुगुणी औषधी चिकित्सा आहे. आपल्याकडे भरपूर सूर्यप्रकाश असूनही या चिकित्सेकडे लक्ष दिले जात नाही ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागते. साधारण पन्नास वर्षांपूर्वी दिल्लीच्या डॉ. नारंग यांनी या सूर्य प्रकाश किरणांचा उपयोग साधून भारतात औषधोपचार केले ही सुदैवाची बाब म्हणावी लागेल. त्यांच्या या कार्याची दखल पाश्चात्य देशांनी घेऊन परदेशात त्यांची व्याख्याने करविली. मृत्यूपूर्वी डॉ. नारंग यांनी सूर्यकिरण चिकित्सा हे पुस्तक हिंदी भाषेत लिहून त्यात सूर्यकिरण चिकित्सेतील आपले अनुभव दिलेले आहेत. ते फार मौलिक स्वरूपाचे असल्याचे कै. भालचंद्र काशिनाथ गर्दे यांनी " धन्वंतरी तुमच्या घरी ' या पुस्तकात उल्लेखिलेले आहे. डॉ. नारंग यांनी सूर्यकिरण चिकित्सा वात, पित्त आणि कफ या तीन आयुर्वेदिक तत्त्वात बसवली आहे. रोगनिर्मिती मानवी शरीरात विशिष्ट रंग लहरींच्या अभावानेही होते या अनुमानावर किंवा सिद्धांतावर आधारित असलेल्या या चिकित्सेत डॉ. नारायण यांनी प्रामुख्याने तांबडा, निळा आणि हिरवा या रंगांचा उपयोग साधलेला आहे.




तांबडा-लाल रंग हा उष्णता, अग्नी यांचा द्योतक असून उत्साहवर्धक व शक्तिवर्धक आहे. या रंग लहरींच्या अभावामुळे कधी रक्तदाबाच्या तक्रारी, संधिवात, पक्षाघात, पंडुरोग इत्यादी होतात. मुख्यता कफाच्या विकारावर या रंग लहरींचा उपयोग होतो. लाल किंवा तांबड्या रंगाच्या बाटलीत पाणी भरून ते सूर्यकिरणात ठेवून प्रभावित करावे. लाल रंगातून आरपार जाऊन सूर्यकिरणांनी प्रभावित केलेले हे पाणी पिणे हा एक उपचार होऊन जातो. लाल तांबडा रंग असलेले बीट, गाजर, तांबोटे, कलिंगड, सफरचंद, बोरे इत्यादी फळे, लाल भाज्या यांचा उपयोग या रंग चिकित्सेत केला जातो.

याप्रमाणे हिरव्या रंगाच्या व्हिस्कीच्या किंवा बियरच्या बाटलीतील सूर्यकिरणाने प्रभावित केलेले पाणी तसेच हिरव्या पालेभाज्या, कैरी यांसारखी हिरवी फळे यांचा उपयोग हिरव्या रंगाच्या चिकित्सेत केला जातो. हिरवा रंग हा सौम्य, उपशामक असल्यामुळे मज्जातंतूंचे विकार, सर्दी, पडसे, हिवताप, अल्सर, लैंगिक विकार, कर्करोग इत्यादी बरे करण्यासाठी हिरव्या रंगाच्या चिकित्सेचा उपयोग होतो. निळा रंग थंड, शांत व वेदनाशामक असल्यामुळे आमांश, दमा, श्वासनालिकेचे विकार, रक्तदाबाच्या तक्रारी, पित्त विकार यांवर निळ्या रंगाच्या बाटलीतील सूर्यकिरणांनी प्रभावित केलेल्या पाण्याचा त्याचप्रमाणे काळी मिरी, निळी- काळी द्राक्षे किंवा मनुका, जांभुळे यांचा विकार निवारणार्थ उपयोग होतो.

वेगवेगळ्या रंगांच्या सूर्यप्रकाश किरणांच्या प्रभावासाठी प्रयोगात वेगवेगळ्या रंगांचे पारदर्शक जिलेटिन पेपर्स, आकाश कंदीलासाठी वापरण्यात येणारा सेलोफेन कागद वापरता येतात. या प्रयोगात पाणी, साखर तसेच तेल यांवर रंगीत पारदर्शक माध्यमांतून सूर्यकिरणांचा प्रभाव पाडून उपयोजकता साधली जाऊ शकते. याबाबत तज्ज्ञांकडून व सूर्यकिरण चिकित्सा संदर्भातील ग्रंथातून माहिती घेऊन योग्य रीतीने प्रयोग केल्यास आरोग्य सुदृढ राखण्यास मदत होऊ शकेल.

**श्री कालर्पणमस्तू।**

## तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

# नियती नावाची अचाट शक्ती.

**(अनुभव कथन-अपेक्षा बिडकर )(भाग तिसरा )**

**(हर्ष आणि माझे बाबा कसेबसे ट्रॉमा सेंटरला पोहचले.)**

सेंटर मधील मेडिकल ऑफिसरने आईला पुण्यातील सह्याद्री मध्ये हलविण्यास सांगितले. त्याआधी केवळ काही तासांच्या ट्रीटमेंटचं हजारोंच्या घरात बिल, विकत घेतलेलं मेडिसिन, इत्यादी गमावून आम्ही सह्याद्रीकडे जाण्यासाठी निघालो. Cardiac ऍम्ब्युलन्स नाही निदान एखाद्या डॉक्टरने तरी आमच्याबरोबर यावे अशी आम्ही विनंती केली. पण अपुरा स्टाफ आहे हे कारण सांगत आमच्या विनवणी कडे दुर्लक्ष केलं. आणि ज्याची भीती होती तेच झालं. सह्याद्री हॉस्पिटल रस्त्यावरच आमच्या नकळत आई आम्हाला सोडून गेली.

आईची अवस्था क्षणाक्षणाला बिकट होत होती. पण काय करू शकणार होतो आम्ही ? सह्याद्री हॉस्पिटल मध्येच आई गेल्याचं त्यांनी डिक्लेर केला. हा आघात पचवणं खूप कठीण गेलं आम्हाला. बाबांना, मला सावरून पुढे ट्रीटमेंट देणं जास्त गरजेचं आहे. हा काळीज कुरतडणारा मोठा धक्का होता. ज्यातून आज तीन वर्षे होत आले तरी आम्ही सावरू शकलो नाहीत. तिला वेळेत उपचार न मिळाल्याचे दुःख आयुष्यभर राहील.

परिस्थिती आटोक्यात कशी आणावी ? हळूहळू एकेकजण भानावर आलो. आठवेल त्याला फोन करत होतो. म्हणतात ना पैशांच्या श्रीमंती पेक्षा जोडलेली माणसं हेच खरं वैभव. आमच्या बाबतीत हे तंतोतंत लागू पडलं. या सगळ्या घटनेत आम्ही उभे राहू शकलो.कारण आमचे कुटुंब !

अपघाताबद्दल समजताच काहीच वेळात माझा दीर आशिष आणि पुतण्या ओम ट्रॉमा सेन्टर ला धावून आले. तर अर्चना (जाऊ) पुण्यात हॉस्पिटल मध्ये बेड शोधत होती. यांच्या जोडीला होते धाकटे दीर जाऊ- अमर अमृता ! सह्याद्री हॉस्पिटल मध्ये ही अतिशय वेगाने आमच्या वर उपचार सुरू झाले. घटना कळताच माझ्या दोन्ही बहिणी-जिजाजी...एक बेंगलोर तर एक सियाटल-अमेरिका तातडीने निघाल्या. पुण्यातील दोन्ही भाऊ अजय-अभय देशपांडे खंबीरपणे पाठीशी उभे राहिले.

**"फ्रेंड्स इन निड इज फ्रेंड्स इंडिड"**

अशी म्हण ऐकत आपण शिक्षण घेतो. पण खरंच ह्याचं प्रत्यंतर यायला असा प्रसंग शत्रूवर पण येऊ नये. हस्ते परहस्ते कित्ती मित्र मैत्रिणींनी मदत केली.माझ्या साहित्यसंपदा चे वैभव धनावडे सर अनेक सदस्यांबरोबर धावून आले.माझी पल्ल्या... पल्लवी पतंगे , माझी मुंबईची मैत्रीण अनुराधा साळवी ( जेवण व अत्यावश्यक सामानासकट ) धावून आल्या. मिलिंदचा जवळचा मित्र वैभव गोखले आणि माझी शाळेची मैत्रीण गौरी देशपांडे/कुलकर्णी हे मला बघायला मुंबईवरून आले. यांचे उपकार आणि आभार कधीच मानणार नाही पण आयुष्यभर ऋणी असेन. अगणित मित्र मैत्रिणींनी, नातेवाईकांनी फोन करून आमची ख़ुशाली तर विचारलीच..पण त्यांच्या प्रार्थनेत आमच्यासाठी शुभ चिंतलं.

राहून राहून प्रत्येकजण आई साठी हळहळत होते. बाबांच्या डोक्याला जखम झाली होती. चार टाके पडले. त्यांना मानसिक धक्का इतका जबरदस्त बसला होता की इतके कणखर असलेले माझे बाबा अक्षरशः कोलमडून गेले. शेवटी मला त्यांच्या मेल वॉर्डात कॉट टाकून दिली. सतत मी त्यांच्याशी बोलत असायचे. माझी अवस्था सुद्धा बरी नव्हतीच.

पहिल्या ऑपरेशनपूर्वी उजवा डोळा जोरदार मार लागल्याने जवळपास बंद होता. डावा हात मनगटात तुटला होता आणि डावा पाय मांडीचे ही हाड मोडले होते आणि कंबरेचे हाड तुटल्याने जवळपास लटकतच होता.

त्यात आईचे दिवस करायचे. ह्या सर्व गोष्टीत एरवी माझा पुढाकार असायचा. पण मी असाह्य. मग इतर नातलग धावून आले. माझे ऑपरेशन सुद्धा सह्याद्री मध्येच करायचं ठरवलं. यात खूपच जणांची मदत झाली.त्या सगळ्यांचे उतराई होणे अशक्य. १५ दिवसांनी मुंबईत आल्यानंतर ही अनेकांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष खूप मदत केली.

**पण ही लढाई इथेच संपली नव्हती.**

# आदर्श व गुरुतुल्य घैसासगुरुजी

(पान ४ वरून)

इतिहासातील वीर पुरुषांच्या विशेषतः जे अज्ञात होते त्यांच्या वीर गाथा यांसारखे विषय कीर्तनासाठी निवडले होते. त्यानंतर काय योगायोग पहा, यांच्याविरुद्ध ते कीर्तन करतात म्हणून शासनाकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या त्याच शासनाने त्यांचे योगदान पाहून त्यांना अधिकृतरित्या कुटुंब नियोजन, पर्यावरण व वृक्ष लागवड या विषयांसाठी कीर्तने करण्यासाठी आमंत्रित केले. त्यानंतर त्यांनी मिळालेल्या संधीचे सोने केले आणि या विषयावर कीर्तन करता-करता कीर्तनकार कसा असावा, कीर्तनकाराने कोणती पथ्ये पाळावी, किर्तनकार हा समाजापुढील कसा आदर्श असतो, त्याने कसे वागावे याबद्दल एक पुस्तक देखील लिहिले आणि आज देखील त्या पुस्तकाच्या आवृत्यांवर आवृत्या निघत आहेत यावरूनच त्याची उपयुक्तता सिद्ध होते.

अण्णा हे बहुरंगी व्यक्तिमत्व. त्यानी आपली नोकरी सांभाळून नाटक कला देखील जोपासली त्यांचा कविता करण्यामध्ये हातखंडा होता एखादा विषय त्यांना दिला तर त्यावर ते ताबडतोब कविता करायचे आणि एवढेच नव्हे तर त्या कवितेला ताल स्वर आदी सर्व गोष्टी असायच्या त्यांना वृत्तांचे उत्तम ज्ञान होते. त्यांच्या कविता या वृत्तात साचेबद्ध केलेल्या असायच्या. कवितेतून काहीतरी आशय हा समाजापर्यंत गेला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे त्यानी अनेक कविता केल्या परंतु दुर्दैवाने त्यांना त्या प्रसिद्ध करता आल्या नाहीत. त्यांच्या आईची आठवण म्हणून ते कविता करताना सावित्री कुमार या टोपण नावाने कविता करत असत. हे सर्व कमी म्हणून की काय त्यानी प्रौढ शिक्षणाचा ध्यास घेतला होता. त्यांच्या काळात प्रौढ शिक्षण हा शासकीय उपक्रम होता. त्यामध्ये त्यांनी स्वतःला झोकून दिले होते, आणि त्याची फलश्रुती म्हणून ते प्रत्येक वाडीवर जाऊन साक्षरता वर्ग चालवत असत आणि त्याचा परिणाम म्हणजे संपूर्ण केळशी गाव हा त्यावेळी त्यांच्या मार्गदर्शनाखाली साक्षर झाला. आजही कित्येक प्रौढ साक्षर झालेले घैसास गुरुजींची आठवण काढतात आणि आम्ही त्यांच्या रात्रीच्या वर्गात शिकलो आहोत असे अभिमानाने सांगतात.

ज्या ठिकाणी समाजाला आपली गरज लागेल ती प्रत्येक गोष्ट आपण करायची मग त्यातून द्रव्यार्जन होवो अथवा न होवो अशी त्यांची वृत्ती असायची आणि या वृत्तीनेच त्यांच्या असे लक्षात आले की कित्येक वेळेला सर्वसामान्य माणसाला धार्मिक कार्यासाठी भटजी मिळत नाही त्यामुळे त्यांचे कार्य तसेच राहत असे , एवढेच नव्हे तर विशेशत: गणपती उत्सवात गणपतीची प्रतिष्ठापना झाल्याशिवाय , बहुतांश लोक अन्नग्रहण करत नाहीत आजही ही श्रद्धा समाजामध्ये कायम आहे परंतु त्यांना पूजा सांगण्यासाठी भटजी मिळत नाहींत आणि सायंकाळी पाच वाजेपर्यंत गणपतीची पूजा होत नाही. मग ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांनी भिक्षुकीचे प्रशिक्षण घेतले व भिक्षुकी सुरू केली. यामुळे त्यांच्याबद्दल समाजामध्ये असलेला आदर दुपटीने वाढला. केळशी व परिसरातील दुर्गम गावी त्यावेळी साधी एसटीची बस सुद्धा जात नसे त्यामुळे हीच अडचण एखाद्या वेळेला अंत्यसंस्काराच्या वेळी येत असे. या कार्याला सुद्धा भटजी मिळत नसे म्हणून त्यानी त्याचे शिक्षण देखील घेतले. अर्थात हे करत असताना तो व्यवसाय म्हणून करायचा नाही तर ती समाजाची गरज म्हणून करायचा असे त्यांनी ठरवले होते आणि म्हणूनच शाळेत असताना देखील वरिष्ठांकडे परवानगी काढून त्यांना माणसे अशा कार्यासाठी बोलावून नेत असत.

अण्णांनी आपलं कर्तव्य कधीच मागे सारले नाही. ते शाळेमध्ये तन्मयतेने शिकवायचे मराठीचा तास हा एक तन्मयतेने ऐकण्याचा विषय होता. त्यांना असणारी सर्व माहिती ते देत असत आणि त्यामुळेच त्यांच्यावर त्या वेळच्या पालकांचा अतोनात विश्वास होता आणि म्हणूनच वेळप्रसंगी त्यानी विद्यार्थ्याला मारले किंवा विद्यार्थ्याला रागे भरले तरी आजच्यासारखे पालक तक्रार घेऊन येत नसत. आजही कित्येक विद्यार्थी त्यांच्याकडून पाठ करून घेतल्यावर आमचा अभ्यास कसा पक्का झाला हे आवर्जून सांगतात. त्यांनी कसला बडेजाव माजवला नाही. अत्यंत साधी राहणी साधा लेंगा, शर्ट आणि टोपी घालणे हा त्यांचा पेहराव. कुठेही ते चालत जायचे ते देखील चप्पल न घालता आणि एखादा मुलगा शाळेत आला नाही तर त्याच्या घरी जाऊन तो का आला नाही त्याची काय अडचण आहे हे ते समजून घ्यायचे आणि आर्थिक अडचण असेल तर ते अन्य लोकांकडून ती कौशल्याने सोडवून घ्यायचे व त्याचे शिक्षण चालू ठेवायचे. अशा कित्येक विद्यार्थ्यांचे शिक्षण त्यांच्यामुळे पूर्ण झालेले आहे. आणि ते सर्वजण आज देखील त्यांच्या त्या कार्याचा आर्जवून उल्लेख करतात. त्यांनी आपल्या मुलांवर देखील उत्तम संस्कार केले. कठोर मेहनतीला पर्याय नाही हे त्यांच्या मनावर बिंबवले. त्यांच्या मुलांचे शिक्षण करणे त्यांना शक्य नव्हते. तरीदेखील बँकेचे कर्ज काढून त्यानी आपल्या मुलांना शिकवले आणि त्याचाच परिणाम म्हणून आज त्यांचा मुलगा एक उत्तम वकील नोटरी ,एक उत्तम लेखक बनला आहे. त्याने देखील कायद्यावरील सर्वसामान्य लोकांना समजतील अशा भाषेतील सुमारे तीस पुस्तके लिहिली असून समाजकार्यात झोकून दिले आहे. त्यांची मुलगी संध्या आत्ताची सौ. अंजली कर्वे देखील महाराष्ट्र शासनाच्या सेवेत अधिकारी म्हणून कार्यरत होती. त्यांच्यामुळेच आम्ही त्यांच्या नाती डॉक्टर, वकील झालो याचा अभिमान देखील त्यांच्या बोलण्यातून जाणवायचा. हे सर्व करत असताना त्यांना कधी अहंकाराची बाधा झाल्याचे आम्हाला जाणवले नाही. सर्व कामे ते अत्यंत आनंदाने करत असत. सर्व परिस्थितीत आनंदी कसे राहायचे हे त्यांच्याकडूनच शिकण्यासारखे आहे. अण्णांनी अनेक सामाजिक कामांमध्ये भाग घेतला. त्यानी केळशी पै फंड यासारख्या ज्ञाती संस्थेचे देखील अनेक वर्ष काम केले. श्री राम देवस्थान साठे आळी केळशीचे त्यांनी अनेक वर्ष सचिवपद सांभाळले. ते केळशी येथील सुप्रसिद्ध महालक्ष्मी न्यासाचे अनेक वर्ष विश्वस्त होते. एवढेच नव्हे तर केळशी एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्तपदी देखील त्यांनी अनेक वर्षे काम केले. कुठलेही सामाजिक काम असले तर

(पान ११ वर)

# "श्रावण"...सणांचा राजा !

प्रा.के.एस.शिरबंदे, दापोली.

**"श्रावण" महिन्याला सणांचा राजा असे संबोधले जाते कारण या विशिष्ट महिन्यात प्रत्येक दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे !**

श्रावण सोमवारी भगवान शंकराचे पूजन, मंगळवारी मंगळागौरी व्रत, बुधवारी बुध पूजन, गुरुवारी ब्रहस्पती पूजन, शुक्रवारी जरा जिवंतिका पूजन, शनिवारी अश्वत्थामा पूजन, आणि रविवारी आदित्य पूजन केले जाते..! तसेच नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जयंती (गोकुळाष्टमी) व पिठोरी अमावस्या असे खास सणही याच महिन्यात साजरे केले जातात...!

**"श्रावणी सोमवार"**

यावर्षी प्रथमच तब्बल 71 वर्षांनी, श्रावण महिन्याची सुरुवात आणि शेवटही सोमवार या दिवसाने होत आहे , तसेच 18 वर्षांनी या श्रावण महिन्यात पाच सोमवार येत आहेत, म्हणून 2024 च्या श्रावण महिन्याला विशेष महत्त्व आहे..!

दर श्रावणी सोमवारी, भक्तगण महादेवाच्या पिंडीला बेलपत्र वाहून, अभिषेक करतात तसेच काहीजण एकभुक्त व नक्त व्रत करतात. एक भुक्त म्हणजे दिवसभर उपवास करून संध्याकाळी भोजन करतात व नक्त वृत्त म्हणजे सूर्यास्तानंतर तीन घटीकांनी म्हणजेच एक तास बारा मिनिटांनी भोजन करून महादेवाची उपासना करतात..! तसेच विवाहित स्त्रिया पहिली पाच वर्षे श्रावण महिन्यातल्या पहिल्या सोमवारी तांदळाची शिवमूठ शिवपिंडीवर वाहतात, दुसऱ्या सोमवारी तिळाची शिव मूठ, तिसऱ्या सोमवारी मुगाची शिवमूठ, चौथ्या सोमवारी जवसाची शिव मूठ व पाचव्या सोमवारी (असेल तर) सातूची शिवमूठ शिव पिंडीवर वाहिली जाते..! भगवान शंकरांना प्रसन्न करण्यासाठी व सुख समृद्धीची इच्छा पूर्ण करण्यासाठी, ओम नमः शिवायचा जप करत शिवमूठ वाहिली जाते.!

**शिव शंकराचा, महिमा अपरंपार!**
**शिव करतात, सर्वांचा उद्धार. !!**

**" मंगळागौर"....**

श्रावणी मंगळवारी, मंगळागौर साजरी केली जाते. नवविवाहित महिला आपल्या माहेरी येतात , व आपल्या गल्लीतल्या सख्यांना बोलावून, झिम्मा फुगडी खेळून रात जागवली जाते..! या मंगळागौर व्रताच्या निमित्ताने सगळ्या माहेरवाशींनी आपल्या गल्लीतल्या सखी सहेली बरोबर सुखदुःखाच्या गोष्टी शेअर करतात..!

**"नागपंचमी".....**

नागपंचमी हा सण श्रावण महिन्यातल्या शुक्ल पंचमीला असतो..! याच दिवशी श्रीकृष्णाने यमुना नदीतील कालिया नागाचे मर्दन करून यमुना नदीच्या पात्रातून सुरक्षित वर आले व तो दिवस नागपंचमीचा दिवस म्हणून साजरा केला जातो..!

नागाला शेतकऱ्याचा मित्र समजतत कारण तो शेतातल्या बिळातील उंदरांचा नाश करतो..! त्यामुळे शेतकरी नागदेवतेला आपला मित्र मानून नागपंचमीला त्याची पूजा करतो. तसेच विवाहित महिला आपले कुंकू अबाधित राहण्यासाठी, तसेच साऱ्या कुमारिका आपल्याला चांगला पती मिळावा म्हणून दूध व लाह्या घेऊन वारुळाला जाऊन नागोबाची पूजा करतात..!

**"नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन"...**

नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन हे सण एकाच दिवशी म्हणजे श्रावण शुक्ल-15 या दिवशी साजरी केले जातात..!

नारळी पौर्णिमेला समुद्र शांत झालेला असतो व या दिवशी सर्व कोळी बांधव समुद्राची पूजा करून प्रतिकात्मक सोन्याचा नारळ समुद्राला अर्पण करतात. त्या दिवशीपासून आपल्या बोटी समुद्रात सोडून आपल्या मच्छीमार व्यवसायाला ते सुरुवात करतात..! या दिवशी सर्व कोळी बांधव व भगिनी बंदरावर जमून आपला जल्लोष कोळी नृत्यातून व्यक्त करतात..!

**"रक्षाबंधन"....**

हा सण भावा-बहिणीच्या अतूट नात्याचे व प्रेमाचे प्रतीक आहे. या दिवशी बहीण आपल्या भावाला औक्षण करून राखी बांधते व आपल्याला संरक्षण मिळावे अशी भावाकडे मागणी करते..!

**"श्रीकृष्ण जयंती" (गोकुळाष्टमी)...**

नारळी पौर्णिमे नंतरचा येणारा सण म्हणजे "गोकुळाष्टमी" , हा सण श्रावण कृष्ण पक्षातल्या अष्टमीला येतो. या दिवशी कृष्णाचा जन्म मध्य रात्री बाराला होतो, या दिवशी रात्री कीर्तनाचा कार्यक्रम असतो, रात्री बाराला जन्म झाल्यानंतर फुले वाहून, सर्वांकडून एकत्रित पाळणा म्हटला जातो..! या कार्यक्रमाला सर्व पुरुष, स्त्रिया व लहान मुले आनंदाने सहभागी झालेले असतात..! सर्वांना पोह्याचा प्रसाद वाटला जातो ! त्यानंतर दोरीला वर बांधलेली दहीहंडी जमलेल्या बाळ गोपाळा कडून फोडली जाते ! व त्यानंतर दहीकालाचा अभिषेक सर्वांच्या अंगावर होतो..! दुसऱ्या दिवशी गावा गावात उंच उंच मुलांचे मनोरे लावून दहीहंड्या फोडल्या

# सरकारी योजना/नोकरी

## महिला वैज्ञानिक योजना -सी

व्यावहारिक S&T हस्तक्षेपांद्वारे सामाजिक आव्हानांना सामोरे जाण्यात स्वारस्य असलेल्या करिअर ब्रेकसह महिला उमेदवारांसाठी MOST ची योजना. बौद्धिक संपदा हक्क (IPR), पेटंट शोध, ज्ञान, मसुदा तयार करणे, फाइल करणे, ट्रेडमार्क, व्यापार गुपिते आणि कॉपीराइट यासंबंधी 1 वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते.

ही योजना टेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशन फोरकास्टिंग अँड असेसमेंट कौन्सिल पेटंट फॅसिलिटेशन सेंटर (TIFAC) द्वारे राबविण्यात येत आहे. विज्ञान मध्ये पदव्युत्तर पदवी; किमान अत्यावश्यक पात्रता अभियांत्रिकी/तंत्रज्ञानातील पदवी किंवा समतुल्य असावी. संगणकीकृत डेटाबेस, संकलन, संकलन, विश्लेषण आणि अहवाल तयार करण्यात प्रवीणता असणे इष्ट आहे.

**फायदे**

- ₹35,000/- प्रति महिना Ph.D./M.D किंवा मूलभूत किंवा उपयोजित विज्ञानातील समकक्ष पदवी.
- M.Phil/M.Tech/M.Pharm/M.V.Sc किंवा समकक्ष पदवीसाठी ₹३०,०००/- दरमहा.
- ₹२५,०००/- प्रति महिना M.Sc./M.B.B.S./B.Tech किंवा मूलभूत किंवा उपयोजित विज्ञानातील समकक्ष पदवी.

**पात्रता**

- अर्जदार महिला असणे आवश्यक आहे.
- अर्जदाराच्या कारकिर्दीत ब्रेक असणे आवश्यक आहे.
- अर्जदाराचे वय 27 ते 45 वर्षे दरम्यान असावे.
- किमान शैक्षणिक पात्रता मास्टर ऑफ सायन्स किंवा इंजिनीअरिंग/टेक्नॉलॉजीमध्ये बॅचलर किंवा त्याच्या समकक्ष असणे आवश्यक आहे.

**अपवाद**

- कायमस्वरूपी पदांवर काम करणाऱ्या महिला अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**अर्ज प्रक्रिया**

ऑनलाइन - ऑनलाइन फॉर्म भरण्यापूर्वी उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवापायरी

- **स्वतःची नोंदणी करा आणि लॉगिन/पासवर्ड तयार करा:**

http://115.112.95.114/wosc/online/Control.do?_mXpa=100&54003&$sa

हा डेटा काळजीपूर्वक लक्षात ठेवा कारण भविष्यातील संदर्भासाठी त्याची आवश्यकता असेल.

- पायरी 2: तपशील भरण्यासाठी आणि अर्ज पूर्ण करण्यासाठी डाव्या उपखंडात दिलेल्या प्रवाहाचे अनुसरण करा:
- लॉगिन > मूलभूत तपशील > पात्रता > रोजगार > प्रकाशन > फोटो/स्वाक्षरी > अंतिम दृश्य/सबमिट.

**फक्त एक समन्वय केंद्र निवडा, कारण केंद्र व्यावहारिक प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी जबाबदार असेल.** तुमच्या पसंतीच्या क्रमाने परीक्षा केंद्र निवडा.

(**अर्ज प्रक्रियेची लिंक** - http://115.112.95.114/wosc/online/instructions.jsp)

**आवश्यक कागदपत्र**

- फोटो
- हस्ताक्षर
- जन्मतारखेचा पुरावा (माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला)
- प्रकाशित पेपर्स
- प्रकाशित/स्वीकारलेल्या आणि पेटंट मंजूर/लागू केलेल्या कागदपत्रांचा तपशील,
- वेळोवेळी मिळालेल्या कोणत्याही शिष्यवृत्तीचा तपशील रोजगार/बेरोजगारीच्या कालावधीचा तपशील.

## महिला वैज्ञानिक योजना -ए

**व्यवसायात पुन्हा प्रवेश करण्याच्या शक्यतांचा शोध घेण्यासाठी, बहुतेक महिला उमेदवारांना विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या प्रगत क्षेत्रांमध्ये संशोधन करण्यासाठी आमंत्रित केले जाते. संस्थेद्वारे संशोधन अनुदान, ज्यामध्ये त्यांच्या करिअरमध्ये (किमान दोन वर्षे) ब्रेक असलेल्या आणि नियमित नोकरी नसलेल्यांना प्राधान्य दिले जाईल.**

या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीसाठी सु-परिभाषित प्रकल्प प्रस्तावासाठी संशोधन अनुदान दिले जाईल. अर्जदाराची फेलोशिप आणि लहान उपकरणे, आकस्मिकता, प्रवास, उपभोग्य वस्तू इत्यादींचा खर्च या अनुदानात समाविष्ट केला जाईल. संस्थात्मक ओव्हरहेड शुल्क अतिरिक्त असेल.

ही मदत, W.O.S.-A. M.Sc. अंतर्गत 5 विषयांमध्ये उपलब्ध आहे, जे म्हणजे i) भौतिक आणि गणिती विज्ञान (PMS), ii) रसायनशास्त्र (C.S.), iii) वैद्यकीय विज्ञान (L.S.), iv) पृथ्वी आणि वायुमंडलीय विज्ञान (EAS), आणि v) अभियांत्रिकी तंत्रज्ञान (ईटी).

ही योजना लैंगिक समानता/समावेशकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावते कारण ती केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या परिसंस्थेतून मेंदूचा निचरा होण्यापासून रोखत नाही तर महिलांना परिसंस्थेमध्ये प्रशिक्षित आणि संलग्न करते. ही योजना सुरुवातीला बेंच-स्तरीय शास्त्रज्ञ म्हणून काम करण्याची संधी देते आणि अखेरीस विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये कायमस्वरूपी पदांसाठी नवीन शक्यता उघडते.

**फायदे**

- पीएच.डी. किंवा प्रति महिना ₹५५,०००/- च्या समतुल्य (आणि लागू HRA). (एकूण प्रकल्पाची किंमत कमाल ₹३० लाख)
- एम.फिल. /एम.टेक. किंवा समतुल्य ₹40,000/- दरमहा (अधिक लागू HRA) (एकूण प्रकल्प खर्च कमाल ₹25 लाख)
- एम.एस्सी. किंवा समतुल्य ₹31,000/- दरमहा (अधिक लागू HRA) (एकूण प्रकल्प खर्च कमाल ₹20 लाख)
- या अनुदानामध्ये अर्जदाराची फेलोशिप आणि लहान उपकरणांची किंमत, आनुषंगिक खर्च, प्रवास, उपभोग्य वस्तू इत्यादींचा समावेश होतो. DBT द्वारे जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीसाठी शिष्यवृत्ती दिली जाते. द्वारे केले जाईल.

**पात्रता**

- अर्जदार महिला असणे आवश्यक आहे, किंवा नियमित/स्थायी पदाव्यतिरिक्त इतर पदावर असणे आवश्यक आहे (एससी/एसटी/ओबीसीसाठी 5 वर्षे सूट). उमेदवार
- अर्जदारासाठी हे अनिवार्य आहे - बेरोजगार असणे, किंवा नियमित/कायम पदाव्यतिरिक्त एखादे पद धारण करणे,
- अर्जदाराचे वय 27 ते 57 वर्षे (SC/ST/OBC) आणि शारीरिकदृष्ट्या अपंग उमेदवारांसाठी 5 वर्षे सूट असणे आवश्यक आहे. )
- अर्जदारासाठी खालीलपैकी कोणतीही किमान आवश्यक पात्रता असणे अनिवार्य आहे: - मूलभूत किंवा उपयोजित विज्ञानातील किमान पदव्युत्तर पदवी, M.Sc. B.Tech किंवा M.B.B.S किंवा इतर समकक्ष व्यावसायिक पात्रता.
- M.Phil/M.Tech/M.Pharm/M.V.Sc. किंवा समतुल्य पात्रता. बेसिक किंवा अप्लाइड सायन्सेसमध्ये पीएच.डी.

प्रकल्प प्रस्ताव दस्तऐवज (स्वरूपासाठी स्त्रोत पहा)

- P.I. मेंटॉरचा रेझ्युमे (स्वाक्षरी केलेला) (स्वरूपासाठी स्त्रोत पहा)
- मेंटॉरचा सारांश (स्वाक्षरी केलेले) जात प्रमाणपत्र (जर SC/ST/OBC/PH असल्यास)
- जन्मतारीख प्रमाणपत्र (फक्त 10वी उत्तीर्ण) P.I.
- P.I चा फोटो.
- सर्वोच्च पदवी
- घर भाडे भत्त्याची स्वाक्षरी (पात्र असल्यास) (स्वरूपासाठी स्त्रोत पहा)

**स्रोत:**

https://online-wosa.gov.in/wosa/instructions
https://online-wosa.gov.in/wosa/formats

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

# सदाबहार टी.व्ही. सिरीयल "तारक मेहता का उल्टा चष्मा'

## चित्रजगत



श्रीराम शेटये.
नालासोपारा

गेली अनेक वर्षे चाहत्यांच्या हृदयमंदिरात जाऊन स्थानापन्न झालेली टेलीव्हिजन सिरीयल म्हणजेच 'तारक मेहता का उल्टा चष्मा.' या सिरीयल मध्ये मानवी जीवनात नित्य घडणारे प्रसंग मोठ्या खुबीने गुंफण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू हे करत असताना त्या प्रसंगात विनोदाची पार्श्वभुमी देण्यात आली आहे.

मराठीत यासारखीच 'चाळ नावाची वाचाळ वस्ती ' नावाची सिरीयल दुरदर्शन वर दाखवली जायची. त्याच्या आठवणी कायमच्या लक्षात राहिल्या. त्या काळात दुरदर्शन हे एकच साधन होते. आजच्या सारख्या खाजगी चानेल चा गवगवा नव्हता. छान चाळीत रहाणार्या लोकांच्या जीवनावर आधारीत कौटुंबिक सिरीयल होती.

तारक मेहता देखील अशीच काहीशी आहे. गोकुळधाम नावाच्या सोसायटीत अशा प्रकारे सर्व जाती धर्माची कुटूंब रहात असतात. त्यांच्यातील स्नेहबंध साकारण्यात मालिकेचे निर्माते असित कुमार मोदी कमालीचे यशस्वी झाले आहेत. हिंदू, मुस्लिम, शिख, ईसाई, पारशी अशा सर्व जाती धर्माची कुटूंब येथे एकोप्याने आनंदात नांदताना दाखवली आहेत.

मराठी, दाक्षिणात्य, गुजराती, पंजाबी अशा भारतातील विविध प्रदेशातील नागरिक ईथे गुण्यागोविंदाने रहाताना दिसतात. विविधतेतली एकता साकारण्यात मालिकेचे निर्माते यशस्वीही झाले आहेत. मालिकेला सोळा वर्षे झालेली आहेत. त्यातली पात्रे चाहत्यांच्या मनात घट्ट बसली आहेत. यातली अनेक पात्राची भुमिका करणारे कलाकार शो सोडून गेले आहेत. काही मृत झालेले आहेत. त्यांची जागा नविन कलाकारांनी घेतली आहे. परंतू एवढे होऊनही मालिकेची लोकप्रियता कायम आहे.

सुप्रसिद्ध गुजराथी लेखक तारक मेहता यांच्या "दुनिया ने उन्धा चष्मा" यांच्या कथेवरून ही मालीका बनविली गेली आहे. तारक मेहता गुजराथी चित्रलेखा मासिकाच्या अंकात हा स्तंभलेखन करीत असत. लेखक तारक मेहता दोन वर्षापूर्वी दिवंगत झाले आहेत. परंतू पर्यायी लेखन करून पुढील सिरीयल चालू आहे.

निला मोदी आणि असित कुमार मोदी यांनी या मालिकेची निर्मिती केली आहे. सब टी. व्ही. वर ही मालिका सोमवार ते शनिवार दररोज प्रसारीत केली जाते. २८ जूलै २००८ पासून ही मालिका आजही सब टीव्ही वर लोकप्रिय आहे.



ही मालिका मुख्य पात्र असलेल्या जेठालाल गडा ( दिलिप जोशी) परिवारा भोवतीच फिरते. जेठालाल एक कच्छी व्यापारी असतो. त्याचा इलेक्ट्रोनिक वस्तूंचा शोरुम आहे. वडील चंपकलाल गडा (अमित भट) आणि पत्नी दया (दिशा वाकानी) मुलगा टीपेंद्र गडा उर्फ टप्पू असे चौकोनी गडा कुटूंब आहे. दुसरे कुटूंब म्हणजे गोकुळधाम सोसायटी मध्ये रहाणारे सोसायटीचे एकमेव सेक्रेटरी शिक्षिक आत्माराम भिडे (मंदार चांदवडकर) आणि त्यांची पत्नी माधवी (सोनालीका जोशी) व मुलगी सोनू हे त्रिकोणी मराठी कुटूंब .

तिसरे कुटूंब लेखक तारक मेहता (शैलेश लोढा) आणि पत्नी अंजली मेहता. तर तिसरे कुटूंब डॉक्टर हाथी आणि त्यांची पत्नी कोमल आणि मुलगा गुलाबकुमार उर्फ गोली. चौथ कुटूंब पंजाबी रोशनसिंह सोंधी त्यांची पत्नी रोशन आणि मुलगा गुरूतेजबहादूर उर्फ गोगी.

आणखीन एक रहिवाशी म्हणजे उपवर तरूण पत्रकार पोपटलाल एकटाच राहतो. त्याचा परिवार नाही. लग्नासाठी अनेक मुली पाहिल्या पण लग्न काही जूळत नाही. सोसायटीच्या खाली छान किराणा दुकान आहे. या दुकानाचा मालक अब्दुल हा देखील सोसायटीचा सदस्य आहे.
अशी छान सोसायटी आहे. इथे सगळे उत्सव अंत्यत उत्साहात साजरे केले जातात. यातून अनेक गंमती जंमती होतात. थोडक्यात या सोसायटी ला निर्माते असित मोदी मिनी इंडिया म्हणतात.







# पोवत्याची पुनव

## मालवणी मुलखात



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

आज पोवत्याची पुनव. कोण कोण म्हणतत, नारळी पुनव. कोण कोण म्हणतत, रक्षाबंधन. आम्ही बाय नाय कधी राखी म्हणत. आम्ही पोवताच म्हणतव. पुर्वीची पोवती काय शोभायची हातात! स्पंज नि टिकले चिकटवलेला ह्या येदा मोठा एकेक पोवता! चार पाच पोवत्यांनी नुसतो हात भरान जाय.

आता सकाळी गुरव येतीत देवाचा पोवता घेव्न. गुरवांनी दिलला देवाचा पोवता देवाक बांधल्याशिवाय आमची भैन भावडांची पोवत्याची पुनव साजरी होना नाय. दरवर्साक गुरव असा दोऱ्याचा, मंतरलला देवाचा पोवता घेव्न येतत. देवाचा पोवता देवाक वाहून देवाची पूजा होता. मगे पाटाभवती रांगोळी, भावाची ओवाळणी, पोवता बांधना होता. भैन भावाचा प्रेम, माया म्हणजे जगातला सर्वात पवित्र नाता, सर्वात पवित्र प्रेम. या दिवशी भावाक पोवता बांधतना भैनीक भरान येता. कधी काय अडचण इली तर भाव मदतीक धावान येयत, नाय येयत. पण भावावरची भैनीची माया ही अपार म्हणजे अपारच!

ल्हानपणी पोवती बांधलले आमचे भाव लय 'भाव' खायचे. एकमेकांक पोवत्यानी भरलले हात दाखवतना, पोवती मोजतना भावांची मान गर्वान फुगायची. आता तर बाय पोवत्यांनी बाजार फुलान जातत. पोवत्यांची कितीतरी व्हरायटी बघताना डोळे सुखावतत. पोवत्याची पुनव आणि दिवाळेतली भाऊबीज हे दोन सण माका लय आवाडतत. कारण ह्या निमतान भैन भाव एकत्र जमतत. गाठीभेटी होतत. क्षेमखुशाली होता, मस्त वाटता!

आम्ही जशी पोवत्याची पुनव साजरी करतव ना, तशी गाबतांच्या वाड्यात नारळी पुनव साजरी करतत. पुर्वी तर म्हणतत, नारळी पुनवेच्या दिवशी गाबित दर्यास सोन्याचो नारळ अर्पण करायचे. आता गाबतांचा पॉटच दर्यावर



अवलंबून ना. दर्यातले माशे गावतले तशे ते विकतले. पावसाळ्यात दर्या लय खवाळता. मगे गाबित बांधव होडये दर्यात घालनत नाय. दोन तीन महिने आराम करतत. जाळ्यांची, होडयेंची दुरुस्ती करतत.

श्रावणातल्या पुनवेदिवशी सगळे गाबित समुद्राची पूजा करतत. दर्याक गाऱ्हाणा घालतत. आता बा दर्या म्हाराजा, पावसाचे दोन अडीच महिने लय खवाळलस. आता शांत हो. आमका आमचे होडये दर्यात लोटूदे. माशे गावादे. यंदा आमच्यार तुझी कृपा कर. माशांक शेवना सोड. आमच्या जीवाचा रक्षण कर. आमच्या पाठीशी उभो ऱ्हव. असा म्हणान दर्याची पूजा करून तेका सोन्याचो नारळ अर्पण करतत. आताच्या म्हागायत सोन्याचो नारळ अर्पण करुक कोणाच्या दाढेखाली मास हा? पण आसात तो नारळ मात्र मोठ्या श्रद्धेन दर्याक अर्पण करून दर्याची करुणा भाकतत. नारळी पुनवेच्या दिवसापासून मग दर्यात होडी लोटतत. दर्याच्या लाटांवर स्वार होतत. नारळी पुनव काय नि, पोवत्याची पुनव काय, कोकणात साजरे होणारे हे मोठे सण. अगे बाय, मी बोलत काय बसलय? आता धा वाजान गेले. आज माका लय कामा पडलीहत. घरातला आवरुचा हा, दादाक पोवता बांधूक जावचा हा.... गे गावडींनी, चल. पटकन तळ्यावरसून दोन दुडी आणूया. माका जावचा हा, मायेराक. दादाक पोवता बांधूक. आणि तुमका ओ.... पोवत्याच्या पुनवेचे मॉप मॉप शुभेच्छा!

## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३७४४३६६..



# दिलदार दिलखुलास व्यक्तिमत्व दिनकर शिंदे

दि. १३ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी सात वाजता व्हाटस् अॅपवर मॅसेज आणि मोबाईल फोन द्वारे प्रख्यात गायक आनंदजी शिंदेचे धाकटे बंधू दिनकर यांचं रात्री निधन झाल्याचे कळले. बातमी वाचून, ऐकून मलाही धक्काच होता. ३१जुलै २३रोजी एक वर्षापूर्वी त्यांच्या सार्थक नावाच्या उत्तम ढोलक वादक मुलाचे निधन झाले तिथपासून दिनकरजी आजारी असल्याचे कुणीतरी कलावंताकडून ऐकलं होतं. आज अशी अचानकपणे दिनकरजी अर्थात सर्व मित्रपरीवारमधला सर्वांचा दिनू गेल्याचं ऐकून,एक चांगला कलावंत बंधू गेल्याचं मनस्वी दुःख झालं.

हल्ली माणसाचं जीवन हे क्षणभंगुर, बेभरवशाचे झाले आहे. सतत दगदग, काहीतरी समस्या आजार ताणतणाव, अस्थिरता, कधी आर्थिक प्रापंचिक आणि भविष्याची चिंता अशी अनेक कारणं आहेत. या सगळ्याच परिस्थितीतून आमचा कलावंत जात आहे. मात्र तो आपली दुःख, अडचण समस्या कुणाकडे शक्यतो बोलतं नाही. कोकणात नमन ही एक लोककला आहे. त्यात राजा, प्रधानजी अशी भुमिका करणारे श्रमिक कष्टकरी गरीब शेतकरी असे असतात. स्टेजवर तो खरोखरच राजा असल्याचा छान अभिनय करतो. मात्र सकाळी नमन संपताच तो कुणाकडे मजुरीला किंवा स्वतःच्या शेतात राबतो त्यावरून एक म्हण पडली." रात्री नमनात राजा, सकाळीं डोईवर भाऱ्यांचा बोजा "सर्वच समाजांतील कलावंतांची अशीच परिस्थिती आहे. लोकलज्जेस्तव आपली अडचण दुखणी कलावंत कुठं जाहीर बोलत नाही हे वास्तव सत्य आहे.

शिंदेशाही घराण साऱ्या महाराष्ट्रात नव्हे देश विदेशात परिचित आहे . गेली पन्नास वर्ष तरी मी ऐकतोय ज्यांच्या अभंग भक्तीगीताने पहाट होते. अशा स्वरसम्राट प्रल्हाद भगवान शिंदे आई रुख्मिणी यांचें चिरंजीव आणि आनंदजी, मिलिंदजीचें धाकटे बंधू दिनकर अर्थात त्यांचा दिन्या, दिनू. हे आपल्या वडिलांच्या आणि ज्येष्ठ बंधूंच्या कला तालमीत घडलेला कलेतील एक पैलवान. ज्यान कधीचं कुठं हार माघार घेतली नाही. रसिकांचं प्रबोधन आणि लोकगीतातून मनोरंजन करण्यात कुठेच कमी पडले नाहीत याचे माझ्यासह अनेकजण साक्षीदार आहेत. प्रत्यक्ष स्टेजवर, कॅसेट, सी डी. व्हीसिडी, युटुब वर त्यांनी अनेक गीते गायली. लोकांच्या स्मरणात राहिली. त्यांनी लोकांची मने जिंकली.आपल्या मित्र परिवारात जिगरी दिलदार दोस्त अशीच ख्याती होती.आपल्या बंधूंचा,त्यांच्या कुटुंबाचा मुलांचा विश्वास त्यांनी संपादन केला. त्यांचा आदर राखला आहे. त्यांनीही या बंधुला, काकाला साथ दिली.

काही वर्षापूर्वी वीस मार्चला महाड येथील चवदार तळ्याजवळ मला ते भेटले. मी चिपळूणला राहतो हे माझा भाचा गायक प्रविण मोहितेनी त्यांना सांगितलं होत. मला म्हणाले भाऊ म्हणजे आनंदजी पण आलेत.भेटा त्यांना.माझ्या भाच्याने चिपळूण मध्ये कार्यक्रम घेतला होता त्याला जोडीला महिला कलावंत मिळत नव्हती. तो दिनकरजीकडे गेला. या बंधूंनीआधी इतरत्र फोन संपर्क करून दिवा, कल्याण परिसरात त्याच्या सोबत फिरून महिला कलावंत यांचा कार्यक्रम ठरवून दिला.

सार्थक कार्यक्रमसाठी चिपळूण आणि एकदा माझ्या गावी घरी आल्यावर मी त्यांची विचारपूस केल्याचं त्याचा सत्कार केल्याच त्यांनी वडिलांना सांगितलेलं असावा. एक चांगला मित्र कलावंत म्हणून दिनकरजी ग्रेट होतेच. पणं एक पिता म्हणूनही त्यांनी आपल्या मुलांना सार्थक, समर्थक, मनोरथ, संविधान यांना साथ प्रोत्साहन दिलेच तसं भावांच्या मुलांनाही प्रेम प्रोत्साहन दिलेलं आहे. नावाला साजेशी अशी साथ संगीत कला क्षेत्रातील पतीला, मुलांना त्यांच्या पत्नीन आदरणीय संगीता वहिनींनी दिली.कलावंत हा पायाला चाक बांधूनच फिरत असतो पणं त्याचा संसार पत्नीचं सांभाळत असते. हा अनुभव सर्व कलावंत यांचा आहे.

दिनकर शिंदेची काही भीमबुद्ध प्रबोधन , मनोरंजन गीते लोकांच्या मुखात आहेत.

**"भिमराव माझा रुपया बंदा, आहे रे कोटी कोटीत" किंवा**
**कान उघडे ठेवून,**
**ऐका लक्ष देऊन**
**जागा कशाला करता क्रोधाला**
**लागू नका कोणी आमच्या नादाला "**
**"नाद आमचा करायचा नाय**

किंवा

**"तळ्याच पाणी, माझ्या भिमानी**
**प्यायलय वाघावानी "**
**"इतिहासाची पाने चाळा, स्फूर्ती येईल नव्यान**
**शिवाच्या गनिमी काव्यान, भीमाच्या क्रांती दिव्यान "**


अशी गीते सादर करतानाचा त्यांचा साभिनय अभिनय बघत रहावा असा असायचा. दिनकर शिंदेनी कॅसेट,आणि जुगलबंदीत गायलेली लोकगीतंही भन्नाट आहेत.त्यांनी गायलेल्या काहीं गीतांच्या कॅसेट सी डी माझ्या संग्रहीसुद्धा आहेत.लोकांची मने चेतविणारा, पेटविणारा, मूर्ती छोटी पणं किर्ती मोठी ही म्हण सार्थ ठरविणारा असा हा कलावंत छोट्याश्या आजाराने आणि आपल्या पुत्र वियोगाच्या दुःखाने पन्नाशी नंतर साठीच्या आत जातो ही त्यांच्या कुटुंबासह कलाक्षेत्राची मोठी हानी आहे. गेल्या तीनचार वर्षांत या शिंदे कुटुंबात तीन दुःखद प्रसंग आले . प्रख्यात गायक मिलिंदजी शिंदेची पत्नी,सार्थक आणि आता दिनकर यांचं निधन यातून सावरण्यासाठी शिंदे कुटुंबाचं मनोबल वाढविण्यासाठी सर्व समाज त्यांचा मित्रपरिवार त्यांच्यापाठिशी आहे, राहिलं. यात संदेह नाही.कलावंत गेल्यावर चार दिवस त्यांचे गुणगान गायले जातात. तसं न होता त्यांच्या स्मृती चिरंतन ठेवण्याची, तो हयात असताना त्याची प्रकृती चांगली राहण्यासाठी काहीतरी, सहकार्य करण्याची उपाय योजना समाज आणि शासनाने तसेच कलावंत संघटनांनी ठामपणे करायला हवी.

**मला समवयस्क असणाऱ्या सर्वांसाठी दिलदार नी दिलखुलास असणाऱ्या दिनकर शिंदे या ज्येष्ठ प्रख्यात कलावंत बंधूंच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.भावपुर्ण श्रध्दांजली.**

# बिगबॉसच्या घरातला 'खरा अगदी, सच्चा बिग बॉस'... सूरज चव्हाण!!!



श्री धनंजय शेटये.
गोळवण,मालवण
सिंधुदुर्ग.




'बिग बॉस सिजन-५ मराठी कलर्स वाहिनीवरील टी. आर. पी. खेचणारा कार्यक्रम सर्वात यशस्वी ठरला आहे. खरंतर बिगबॉस म्हणजे धिंगाणा घातला जातो. पण कार्यक्रमात मराठमोळ्या अस्सल महाराष्ट्रीयन मातीतला रांगड्या सूरज चव्हाण याच्या संस्कृती, परंपरा जपण्यासाठी धडपडणा-या सोज्वळ, निष्पाप गरीबीचा संघर्ष भोगलेल्या अतिसामान्य जीवनातुन पुढे आलेल्या सूरजच्या स्वभावाने संपूर्ण खेळ आकर्षक बनविला. सूरजला नायकासारखा देखणा चेहरा नाही, सुरज बाह्यरुपाने सामान्यच पण अंतर्मनानं माणुसकीचा झरा आहे, सच्चाईचा आरसा आहे, गरीबीचा कळवळा आहे,

बिग बॉस सिजन-५ मराठी कलर्स वाहिनीवरील टी. आर. पी. खेचणारा कार्यक्रम सर्वात यशस्वी ठरला आहे. खरंतर बिगबॉस म्हणजे धिंगाणा घातला जातो. पण कार्यक्रमात मराठमोळ्या अस्सल महाराष्ट्रीयन मातीतला रांगड्या सूरज चव्हाण याच्या संस्कृती, परंपरा जपण्यासाठी धडपडणा-या सोज्वळ, निष्पाप गरीबीचा संघर्ष भोगलेल्या अतिसामान्य जीवनातुन पुढे आलेल्या सूरजच्या स्वभावाने संपूर्ण खेळ आकर्षक बनविला. सूरजला नायकासारखा देखणा चेहरा नाही, सुरज बाह्यरुपाने सामान्यच पण अंतर्मनानं माणुसकीचा झरा आहे, सच्चाईचा आरसा आहे, गरीबीचा कळवळा आहे,

सूरज चव्हाण अतिशय गरीबीतून संघर्षमय जीवनातून पुढे आलेल्या अस्सल गावरान मातीतल्या रांगड्या कलाकारामुळे बिगबॉसकडे प्रेक्षक वळले आहेत. या सिझन मध्ये रिलस्टार्स पण दाखल झाले आहेत. पण सच्चा खेळ मात्र सूरज चव्हाण यांचा बाजी मारताना दिसत आहे. सूरजला तर बिगबॉसच्या घरात प्रवेश केल्यावर वॉशरुमचा दरवाजा पण उघडता येत नव्हता. अशा परिस्थितीत तिथले स्पर्धक सूरजकडून हीन दर्जाची कामे करुन घेऊ लागले. खरे तर कोणतेच काम हे लहान मोठे हीन दर्जाचे नसते. पण एखाद्याच्या गरीब स्वभावाचा फायदा घेणारी, चांदीचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलेले काही उच्चभ्रू अहंकारी स्वभावामुळे दुस-याला कमी लेखतात. पण आयुष्यात ब-याचदा परिस्थितीचे चटके अन् अपमानाचे फटके खात संघर्षमय धडपड जीवनात पावलोपावली सहन करणारा सूरज कधीच डगमगला नाही. कारण त्याचे विचार सच्चे आहेत. बहीणींवर माया करणारा सूरज वर्षा उसगावकर यांना प्रेमाने आई समान मानतो. गरीबी, संघर्ष याबाबत तो प्रेरणादायी विचार आपल्या कृतीतून तर कधी बोलताना दाखवून देतो. तो मुळात बिगबॉसच्या घरात खोटी अॅक्टिंग करुन इतरांसारखे नाटकी वर्तन करायला आलाच नाही. तो सच्चाईने खेळतो आहे. सुरवातीला नवखा असल्याने थोडा डगमगला पण नंतर मात्र सावरला. आज त्याला बिगबॉसच्या घरातल्या खेळाचे सर्व डावपेच समजू लागले आहेत. देशभरात विखुरलेले कलर्स मराठीचे प्रेक्षक सूरज चव्हाणला सपोर्ट करत आहेत.

सूरज आईवडिलांविना पोरकंपणाचं जीवन जगला. त्यामुळे तो लग्न करेन तर एखाद्या अनाथ मुलींशी! असं बोलून जातो. त्याच्या प्रगल्भ विचारांची खोली दिसून येते. वैचारिक सामाजिकता मनाचा वेध घेते.
सुरज चव्हाण हा मुळचा बारामती तालुक्यातील मोडवे गावचा आहे. तर तो सध्या त्याच गावामध्ये राहत आहे. सुरजने लहानपणीच आपापल्या आई आणि बाबांना गमावले आणि तो लहानपणीच अनाथ झाला. सुरजचे आई-वडिलांच्या गेल्यानंतर त्याचा सांभाळ त्याच्या मोठ्या बहिणीने केला. आई-वडिल नाही म्हणजे अवघडच तसेच यामुळे सूरजला शाळेतही जात आले नाही, तर सूरजचे शिक्षण हे आठवीपर्यंतच झालेलं आहे. तो लहानपणी मोलमजुरी करत असे. त्यांने काही काम केल तरच त्याला अन्न भेटत असे तर कधी कधी त्याची रात्रीच्या जेवणाची ही सोय होत नसायची. असे हालाखीचे दिवस सुरजने काढलेले आहेत.

सुरज चव्हाणच्या जीवनाला वळण लावणारे सर्वात मोठे साधन म्हणजे टिक टॉक,२०१९ मध्ये 'टिकटॉक'ने सूरजच्या आयुष्याला एक वेगळे वळण दिले, मोलमजुरी करत असताना एका दिवशी सुरजच्या बहिणीच्या मुलाने त्याला टिक टॉक बद्दल सांगितले. त्यानंतर सुराजने 'टिकटॉक'वर एक व्हिडीओ पोस्ट केला, विशेष म्हणजे त्याचा तो व्हिडीओ खूप व्हायरल झाला. ही गोष्ट सूरजला समजल्यानंतर त्यांनी मोलमजुरी करून एक स्मार्टफोन घेतला आणि स्वतःचे टिक टॉक अकाउंट ओपन केले. त्याला त्यावरती चांगल्या प्रमाणात प्रतिसाद मिळत गेला. मग त्यानेही पुन्हा मागे वळून पाहिलं नाही.

पण थोड्याच दिवसात सुरज सोबत सर्वच टिकटॉक स्टार्स वर संकट आले, तर झाले असे की भारतात कोरोना या रोगामुळे चीन च्या सर्व अॅप्लिकेशन्सवर बंदी घालण्यात आली आणि त्यासोबतच भारतात टिक टॉकबंद झाले. त्यानंतर सुरजने जीवनात हार न मानता त्याने इंस्टाग्रामवर अकाउंट उघडले आणि तो तेथे व्हिडियो पोस्ट करत गेला. टिक टॉकवर असणारे फॉल्लोअर्स त्याला इंस्टावर फॉल्लो करू लागले. इन्स्टाबरोबर सुरज Youtub वरती ही व्हिडीओ बनवू लागला. तसेच या माध्यमातून त्याने खूप पैसे कमावले आणि त्याची संपूर्ण लाईफ बदलून गेले. सूरज चव्हाणचे सध्या इंस्टाग्रामवर एक मिलियनपेक्षा जास्त फॉल्लोअर्स आहेत.

आज सूरज बिगबॉसच्या घरात सर्वात प्रभावीपणे सच्चा खेळ खेळताना दिसत आहे. सुरज रांगडा मावळा आहे. लढवय्या आहे, कठीण परिस्थितीत, संघर्षमय जीवनात संकटाना पायदळी तुडवून यशापर्यंत पोहोचण्यासाठीची प्रचंड धडपड आहे.

**गवताच्या पात्याप्रमाणे पुरामध्ये नम्रपणे झुकून नंतर पुन्हा ताठमानेने संघर्षमय जीवनात वाटचाल सुरू ठेवणारा आहे. कुठल्याच गोष्टीचा गर्व, अहंकार नाही. सूरज असाच खेळत राहा.**



## मटर करंजी



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**मटर करंजी ही एक चविष्ट आणि पोषणदायी डिश आहे जी हिवाळ्यात विशेषत: बनवली जाते. यामध्ये ताज्या मटाराचा वापर करून करंजी तयार केली जाते, जी खूप खुसखुशीत आणि स्वादिष्ट असते. चला तर मग मटर करंजीची सविस्तर रेसिपी पाहूया.**

**साहित्य:**

**बाहेरचे आवरण (कवच) तयार करण्यासाठी:**

- मैदा: २ कप रवा: २ चमचे , मीठ: चवीनुसार
- तूप: २ चमचे पाणी: आवश्यकतेनुसार (कणिक मळण्यासाठी)

**मटरच्या सारणासाठी:**

- ताजे मटार: १ कप (मध्यम बारीक करून घ्या)
- आलं-लसूण पेस्ट: १ चमचा, हिरवी मिरची पेस्ट: १ चमचा
- जिरे: १ चमचा, बडीशेप: १ चमचा, धने पूड: १ चमचा
- गरम मसाला: १/२ चमचा, मीठ: चवीनुसार, साखर: १/२ चमचा
- तूप/तेल: १ चमचा, कोथिंबीर: बारीक चिरलेली (सजावटीसाठी)

**तळण्यासाठी:**

- तेल: आवश्यकतेनुसार

**कृती:**

**बाहेरचे आवरण तयार करणे:**

1. **कणिक मळणे:**
   - एका परातीत मैदा, रवा, मीठ, आणि तूप घाला. या मिश्रणाला चांगले मिसळा आणि त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून मऊसर कणिक मळून घ्या. कणिक १०-१५ मिनिटे झाकून ठेवा, ज्यामुळे ती व्यवस्थित सेट होईल.

**मटरचे सारण तयार करणे**

- ताजे मटार एकदम बारीक करून घ्या. तुम्ही हे मिक्सरमध्येही करू शकता. एका कढईत तेल किंवा तूप गरम करा. त्यात जिरे, बडीशेप घालून फोडणी तयार करा. त्यानंतर आलं-लसूण पेस्ट आणि हिरवी मिरची पेस्ट घालून चांगले परता. मटार कीस घालून मध्यम आचेवर ५-७ मिनिटे परतून घ्या, जोपर्यंत मटार मऊसर होत नाही.
- मटार मऊसर झाल्यावर त्यात धने पूड, गरम मसाला, मीठ, आणि साखर घाला. हे सर्व साहित्य चांगले मिसळून घ्या. मिश्रण एकसारखे झाल्यावर ते गॅसवरून उतरवून घ्या आणि थंड होण्यासाठी ठेवा. मिश्रण थंड झाल्यावर त्यात कोथिंबीर घाला.

**करंजी बनवणे:**

- मळलेल्या कणकेचे छोटे गोळे बनवा आणि त्याचे छोट्या पुऱ्या लाटा. प्रत्येक पुरीच्या मध्यभागी मटरचे सारण ठेवा. पुरीच्या कडांना पाण्याचा वापर करून बंद करा आणि करंजीच्या आकारात दुमडा.करंजीचे कडे चांगले बंद केल्याची खात्री करा, अन्यथा तळताना सारण बाहेर येईल.

**तळणे:**

- एका खोल पातेल्यात तेल गरम करा. गरम तेलात तयार केलेल्या करंज्या सोडून गोल्डन ब्राउन होईपर्यंत तळून घ्या. करंजी तळून झाल्यावर ती कागदावर काढा, जेणेकरून अतिरिक्त तेल निघून जाईल.

**सर्व्हिंग:**

मटर करंजी गरमागरम सर्व्ह करा. या करंज्या नाश्त्यासाठी, चहासोबत किंवा जेवणाच्या वेळी साईड डिश म्हणून खूप छान लागतात. तुम्ही या करंजीला हिरव्या चटणीसोबत किंवा टोमॅटो सॉसबरोबरही सर्व्ह करू शकता.

## आदर्श व गुरुतुल्य घैसासगुरुजी

(पान ७ वरून)

कुठलेही सामाजिक काम असले तर त्या ठिकाणी गुरुजी हमखास असायचे असा एक नित्यक्रम केळशी पंचक्रोशीत वर्षानुवर्ष चालू होता. हे सर्व करत असताना त्यांनी आपला शिक्षकी पेशा देखील अत्यंत उत्कृष्टरित्या सांभाळला आणि म्हणूनच त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. ते वेळास या गावी मुख्याध्यापक म्हणून पदोन्नतीवर काम करू लागले. त्याठिकाणी देखील नाना फडणीस जयंती यासारख्या कार्यक्रमात बहुजन समाजाला समाविष्ट करून घेतले. या साऱ्या कामात त्यांना त्यांच्या पत्नीची म्हणजे माझ्या आजीची उत्कृष्ट साथ लाभली. दुर्दैवाने दहा वर्षापूर्वी त्यांच्या तिचे निधन झाले. सहाजिकच उतार वयामध्ये पत्नीचे निधन झाल्यानंतर अनेक पुरुष हे डिप्रेशनमध्ये जातात. परंतु मृत्यू हा सृष्टीचा नियम आहे. कोणीतरी पुढे मागे जाणारच हे लक्षात घेऊन त्यानी ज्या ज्या वेळी त्यांना पत्नीची आठवण येई त्या त्या वेळी लहान मुलांसाठी एक गोष्ट त्याने लिहून काढायची असे ठरवले व ती अमलात देखील आणली. नंतर या सर्व गोष्टींचे एक पुस्तक त्यांच्या पत्नीच्या वर्ष श्राद्ध दिनी प्रसिद्ध केले. या पुस्तकाचे देखील अनेकांनी कौतुक केले त्याचे कारण लहान मुलांवर संस्कार करणाऱ्या अशा अनेक गोष्टी त्यानी त्यात लिहिल्या होत्या. खरोखरच अशा पद्धतीने आपल्या मृत पत्नीला श्रद्धांजली वाहणारा पुरुष विरळाच असेल असे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. शिक्षकी पेशा सांभाळताना त्यांना अनेक प्रकारचे पुरस्कार लाभले.

जनगणनेचे काम करताना तर त्यांना उत्कृष्ट कामाबद्दल राष्ट्रपतींचे सिल्वर पदक देखील मिळालेले आहे. आपल्या केळशी गावामध्ये एक कायमस्वरूपी वाचनालय असावे असा त्यांचा ध्यास होता आणि त्यासाठी त्यानी अपार मेहनत घेतली आणि सन १९७२ मध्ये ज्ञान विकास मंडळ केळशी हे मंडळ स्थापून त्याला शासकीय मान्यता मिळवून दिली. त्या मंडळा मार्फत ज्ञान विकास वाचनालय सुरु केले. अगदी मृत्यू पूर्वी काही महिन्याआगोदरपर्यंत ते या वाचनालयाचे संस्थापक सचिव होते. या वयात देखील ते वाचनालायचे काम उत्कृष्टपणे सांभाळत होते. या कामाची दखल घेऊन ग्रंथालय चळवळी मार्फत उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता म्हणून त्यांना वयाच्या ८८ व्या वर्षी गौरवण्यात आले. आपले वाचनालय हे ब वर्गमध्ये आहे याची त्यांना सतत खंत असायची. ते ब वर्गमध्ये असण्याचे कारण म्हणजे या वाचनालयाला स्वतःची अशी वास्तु नाही आणि ती वास्तू व्हावी म्हणून ते अगदी शेवटच्या दिवसांपर्यंत कार्यरत होते. लहानपणी स्त्रीशिक्षणाच्या बाबत आनंदीआनंद होता. स्वतः ब्राह्मण समाजाचे असून त्यांनी इतर समाजासाठी घेतलेली मेहनत तसेच योगदानाबद्दल त्यांनी सांगितलेल्या गोष्टी आजही मनात कायम आहेत. वेळास मध्ये शिक्षक असताना एका इतर समाजाच्या एका महिलेला उपचार मिळत नाहीत म्हणून गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार करून उपचार होईपर्यंत ठिय्या आंदोलन करून गटविकास अधिकारी यांना उपचार न मिळणाऱ्या महिलेच्या घरी येण्यास भाग पाडणारे घैसास गुरुजी आजही त्या परिसरातील लोकांना आठवतात. सामाजिक सलोखा जपून समाजकारण आणि शिक्षण याचे महत्त्व समजावून सांगणाऱ्या घैसास गुरुजींचे, माझ्या आजोबांचे एक वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांनी केलेले मोलाचे मार्गदर्शन कायम स्वरूपी स्मरणात राहील. अशी माणसे म्हणजेच समाजाची प्रेरणास्थाने आहेत.

**अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले काम कसे चालू ठेवायचे आपल्या वर येणाऱ्या संकटांचा बाऊ न करता घेतलेले काम वसा म्हणून करायचे हा आदर्श त्यांच्याकडून नक्कीच घेण्यासारखा आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली!!**

## नारळी पौर्णिमा

(पान २ वरून)

कोकणात मुळातच प्रचलीत आहे. त्यातही विशाल आणि विस्तीर्ण अशा दर्यास देव मानून त्याची अवघ्या कोळी जातीवर कृपा होण्यासाठी त्याचे केले जाणारे पूजन म्हणजे साक्षात निसर्गालाच प्रिय देव मानण्यासारखे आहे. दरवर्षीप्रमाणे आजही हा नारळी पौर्णिमेचा पारंपारिक सण पाजपंढरीत फार मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.

**मग आता वाट कसली बघताय, चला! चला! पाजपंढरीच्या दर्याकडे चला! नारळी पौर्णिमेच्या सणाला चला!**

## "श्रावण"...सणांचा राजा !

(पान ३ वरून)

जातात..! सर्वांना दही काल्याचा प्रसाद वाटला जातो व अशा तऱ्हेने जन्माष्टमीचा कार्यक्रम संपन्न होतो..!

**"पिठोरी अमावस्या"....**

श्रावणी अमावस्येला म्हणजेच श्रावण कृष्ण-15 ला, "पिठोरी अमावस्या"असे म्हणतात..! ज्यांची मुले जगत नाहीत अशा स्त्रिया हे पिठोरी व्रत करतात..! तसेच त्यांच्या मुलांच्या दीर्घायुष्यासाठी व मुले निरोगी, बुद्धिमान शौर्यवान व्हावीत, तसेच त्यांची वंशवृद्धी व्हावी म्हणून स्त्रीया हे पिठोरी व्रत करतात..!
त्यामुळे या पिठोरी अमावस्येला "मातृदिन" असेही म्हणतात...!

माझ्या वाचक मित्रांनो..! हा श्रावण मनमोहक,अल्लादायक,हिरवागार, व मनाला प्रसन्न करणारा असा महिना आहेच, पण त्याचबरोबर पर्यावरणाला अनुकूल असे व मनाला आनंद देणारे, अनेक सण व उत्सव याच महिन्यात येतात, म्हणूनच या श्रावण महिन्याला "सणांचा राजा"असे म्हटले जाते !

या लेखाला पूर्णविराम देण्यापूर्वी, मला असे म्हणावेसे वाटते की...,

**आहे श्रावण हिरवा**
**त्याला आहे,**
**सणांची सोनेरी किनार..!**
**म्हणूनच त्याची,**
**महती आहे अपरंपार..!!**

## स्वातंत्र्य

नाही कळला अजुनी आम्हा
स्वातंत्र्याचा अर्थ खरा,
सारे यारे, बाजूस ठेवू
आपण आपुला स्वार्थ जरा ||१

विचारमुक्ती, आचारमुक्ती
हाच याचा नेम असे,
विधायकी त्या कृतींमधूनी
सर्वांठायी प्रेम वसे ||२

हक्कांसाठी लढतो आपण
पण कर्तव्यांचे काय?
कधीच खेचू नका गड्यांनो
ते सोबतच्यांचे पाय ||३

जात, धर्म अन् पंथ वंश
ठेवू बाजूला थोडे,
यांच्यावाचून मानवतेचे
ना अडले कुठे घोडे ||४

येता सोबत स्वातंत्र्यासह
समता आणि बंधुभाव,
प्रत्येकाच्या कृती आणि
कल्पनेसही मिळेल वाव ||५

सत्य अहिंसा या मुल्यांचा
खराखुरा परिपोष जो,,
उंचीवरती घेऊन जाई
भारतमातेला मग तो ||६

मनोभेदे तुटताती मने
भिन्न मते नक्की हवी,
भासणारच नाही आम्हा
स्वातंत्र्याची गरज नवी||७

**पी. एस. कौलापुरे, आरवली-शिरोडा,सिंधुदुर्ग**

## काव्यांगण

### बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो...

आता परत एकदा भजनाच्या तालावर कोकणी माणुस झुलतलो..
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो...

सगळी कामा बाजुक सारुन गणपतीक गावाक जावुचो इचार तो मनी धरतलो..
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो...

खिशात नसलो पैसो आडको तरी बाप्पासाठी मनान श्रीमंत होतलो...
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो..

रजा नाय हुनान वगी नाय बसतलो
कायव आडेबाजी करुन सायेबा समोर ढोंगा तो रचतलो..
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो...

चारेक आठ दिसाची रजा पास करुन पुढच्या तयारीक तो लागतलो..
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो...

सगळे गाडये फुल झाले जाव कसो हुनान ईचार मात्र तो मनी करतलो..
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो...

आयत्या येळाक गावात ती कोकण रेल धरतलो
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो.

कितकी ती गर्दी असांदे बाप्पाचो जयघोष करीत गावचो पल्लो गाटतलो..
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो...

चाकरमनी एकदाचो सुखरुप कोकणात दाखल होतलो..
आणी बाप्पाच्या आगमनाने कोकण माझो फुलतलो..

**प्रमोद राऊळ**
**(सावंतवाडी माडखोल)**
**मोबा: ९८९२४१७७८२**

## फरक शोधा



## सुराज्य

स्वातंत्र्य मिळाले,
स्वराज्य ही मिळाले...!
पण नाही झाले...
अजूनि ते सुराज्य...!

या स्वराज्यात...
श्रीमंत श्रीमंतच झाला,
गरीब गरीबच राहिला...!
एका भाकरीला,
तो महाग झाला.....!

सत्ताधारी नेते...
थोडी सेवा करती,
भरपूर मेवा खाती...!
विरोधी पार्टी...
त्यांची खुर्ची ओढती,
सरकार कोसळण्याची
वाट पाहती.....!

असा आहे हा...
सारा स्वार्थी बाजार...!
इथं जनता झाली,
महागाईने,भ्रष्टाचाराने
बेहाल, बेजार.....!

स्वातंत्र्य मिळाले
स्वराज्य ही मिळाले...!
पण नाही झाले
अजूनि ते सुराज्य...!

हे युवका.....!
तू आता जागा हो...
तूच सावरसी या देशाला..!
तुझी बुद्धी, तुझी हुशारी
लाव तू आता पणाला...!
अन आता, उचल विडा तू
करण्या सुराज्य, शिवराज्य
या देशाला.....!

हे युवका.....!
इतिहासातल्या शहिदांचा,
क्रांतीकारकांचा अन्
स्वातंत्र्यवीरांचा ,
घेऊनि आदर्श तू...
चाल पुढे, तू चाल पुढे...!
चाल पुढे, तू चाल पुढे...!!


हे युवका...!
तूच करशील या,
स्वराज्याचे स्वप्नातील सुराज्य...!
तूच करशील या,
स्वराज्याचे स्वप्नातील सुराज्य...!!

**प्रा.के.एस.शिरबंदे,**
**दापोली.**

# बालजगत





**कु. शमिका नयनेश मुलूख, इयत्ता- आठवी**

**हिने काढलेले सुंदर चित्र.**

चंद्रनगर दापोलीच्या शाळेतील कु शमिका या मुलीने काढलेले हे बोलके चित्र मुलांच्या कल्पकतेची चुणूक दाखवत आहे. अतिशय सुंदर कल्पना आणि सुंदर चित्राची रंगसंगती !

## जागतिक अवयवदान दिनानिमित्त 'पोस्टर मेकिंग स्पर्धा.






**कु.जिया रघुवंशी**
**इ.९ वि.'अ'**
**ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल, चारकोप कांदिवली प मुंबई**



**कु. सार्थक तेजस दळवी**

**या छोट्या मुलाने मातीपासून बनविलेला बाप्पा.**

## चंद्रनगर शाळेत स्वातंत्र्यदिन सोहळा



**दापोली-** भारताचा ७८ वा स्वातंत्र्यदिन व ध्वजारोहण कार्यक्रम दापोली तालुक्यातील जिल्हा परिषद चंद्रनगर मराठी शाळेत समारंभपूर्वक साजरा झाला. चंद्रनगर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रुपेश बैकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी चंद्रनगर गावच्या सरपंच भाग्यश्री जगदाळे, उपसरपंच राजेंद्र मिसाळ, जिल्हा नियोजन समिती सदस्य मोहन मुळे, ग्रा. पं. सदस्य गौरी मुलूख, मानसी मुलूख, संतोष तांबे, शंकर रांगले, सुनील रांगले, शैलेश मुलूख, चंद्रकांत मुलूख, गौरी पागडे, चंद्रनगर शाळेचे मुख्याध्यापक मनोज वेदक, ग्रामसेवक संदिप सकपाळ, शिक्षक बाबू घाडीगांवकर, मानसी सावंत, रेखा ढमके, पुनम जाधव आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्यदिन सोहळ्यानिमित्त शाळेत देशभक्तिपर समूहगान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी चंद्रनगर गावातील अनेक नागरिक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक मनोज वेदक यांनी सर्वांचे स्वागत केले व शेवटी आभार मानले.

## देशभक्तिपर गीतगायन स्पर्धेत चंद्रनगर शाळेचे यश

**दापोली-** दापोली येथील लायन्स क्लब या संस्थेने भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित केलेल्या देशभक्तिपर समूहगान स्पर्धेत चंद्रनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी लहान गटात तृतीय तर मोठ्या गटात द्वितीय क्रमांक पटकावून सुयश संपादन केले आहे. चंद्रनगर शाळेने मिळविलेल्या या यशाबद्दल अनेकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.




दापोली येथील लायन्स क्लब ही समाजसेवी संस्था दरवर्षी भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी देशभक्तिपर समूहगान स्पर्धा आयोजित करते. दापोली शहरातील राधाकृष्ण मंदिर सभागृहात पार पडलेल्या या स्पर्धेत दापोली तालुक्यातील अनेक शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत चंद्रनगर शाळेतील




विद्यार्थ्यांनी लहान गटात तृतीय तर मोठ्या गटात द्वितीय क्रमांक पटकावला. रोख रक्कम व ट्रॉफी देऊन या विद्यार्थ्यांचा लायन्स क्लबने सन्मान केला.

चंद्रनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या या यशाबद्दल चंद्रनगर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रुपेश बैकर, उपाध्यक्ष राकेश शिगवण, सरपंच भाग्यश्री जगदाळे, मुख्याध्यापक मनोज वेदक, मानसी सावंत, बाबू घाडीगांवकर, रेखा ढमके, पुनम जाधव आदी अनेकांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.